दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य सपादक सागर राणा अभोरे     सपादक बडूभाऊ इगोले

वाशीम ■ रविवार दिनांक 11 मे 2025 ■ वर्ष : 1 ले ■ अंक : 347 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL03935


## निवडक

### वणौशी ग्रामस्थांना मुबलक पाणी

**मुंबई :** उन्हाळ्यात विशेष करुन गावागावात पिण्याच्या पाण्याची ओरड असते. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोलीतील वणौशी येथील ग्रामस्थांची गेल्या २० वर्षांची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली आहे. २० वर्षे रखडलेली विहिर ग्रामस्थांच्या सेवेत दाखल झाली गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते या सार्वजनिक विहीरीचे उद्घाटन करण्यात आले आहे. शिवसेनेसोबत नेहमी खंबीरपणे असलेली ही वाडी दीर्घकाळ पाण्याच्या समस्येला तोंड देत होती. ही गरज केवळ विकासाची नव्हे, तर माणुसकीची होती. आणि म्हणूनच ही विहीर मंजूर करताना एक जबाबदारी म्हणून हा निर्णय घेतला. ही विहीर पूर्ण झाली असून, कामाची गुणवत्ता पाहून समाधान वाटते, असे ही कदम म्हणाले. तसेच ग्रामस्थांच्या मागणीवर तत्काळ निर्णय घेऊन २१ लाख रुपयांची मंजुरी त्यांनी या विहिरी साठी दिली होती. पाणी ही केवळ सुविधा नसून जीवनाचा मूलभूत हक्क आहे. या पुढेही तुमच्या गावाच्या प्रगतीसाठी सदैव कटिबद्ध राहीन, असे आश्वासन कदम यांनी यावेळी ग्रामस्थांना दिले.

### ऑनलाईनबाबत लेखा, कोषागाराचे आवाहन

**मुंबई :** निवृत्ती वेतन सुरू करणे, निवृत्ती वेतन बंद करणे, निवृत्ती वेतन फरक अदा करणे अथवा अतिरिक्त रक्कम वसूल करण्यासाठी राज्यातील कोषागार कार्यालयामार्फत फोन, मोबाईलने संपर्क करुन निवृत्ती वेतनधारकांना कळविले जात नाही. तसेच व्हॉट्स अॅपद्वारे अथवा इतर सोशल मिडियावरून निवृत्तीवेतन बंद होऊ नये, यासाठी लिंक ओपन करून फॉर्म भरण्याबाबत कळविले जात नाही. तरीही कुठल्याही अमिषाला बळी पडू नये असे आवाहन लेखा अधिकारी, कोषागार अधिकारी यांनी निवृत्ती वेतन धारकांना केले आहे. कोषागार कार्यालयामार्फत कोणत्याही कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकाच्या घरी पाठविले जात नाही. कोषागारामार्फत करण्यात येणाऱ्या सर्व व्यवहारांकरिता पत्रव्यवहार केला जातो. सर्व निवृत्तीवेतनधारकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी फोन पे / गूगल पे/ ऑनलाईन रक्कम भरण्याच्या अथवा ऑनलाईन फॉर्म भरण्याच्या संदेशास बळी पडू नये.

### जत येथे नवीन उप आरटीओ मान्यता

**मुंबई :** सांगली जिल्ह्यातील जत शहरात उप प्रादेशिक परिवहन कार्यालय (डीवाय आरटीओ) स्थापन करण्यास महाराष्ट्र सरकारने मान्यता दिली आहे. यासह, राज्यात आता ३५ उप आरटीओ आणि २४ आरटीओ आहेत. शुक्रवारी जारी केलेल्या सरकारी ठरावानुसार (जीआर) नवीन आरटीओ कार्यालयाचा वाहन नोंदणी कोड एमएच-५९ असेल.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी सज्जता

**राज्य सरकारचा २२ कोटींचा निधी | मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक संवेदनशील विभागाला अधिक निधी**

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** युद्ध जन्य परिस्थितीत आपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा स्तरावर २२ कोटी ५० लाखांचा निधी उपलब्ध केला आहे.

मुंबई ठाणे पुणे नाशिक रत्नागिरी सिंधुदुर्ग आदी संवेदनशील विभागाला अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

भारत - पाक संघर्षाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण देश अलर्ट मोड वर आहे. दहशतवादी हल्ल्याचा धोका लक्षात घेता दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सुरक्षेचा आढावा घेत सुरक्षेसंबंधी योग्य ती दक्षता घेण्याचे आदेश दिले आहेत. तसेच आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा स्तरावर कुठलीही मदत हवी असल्यास राज्य सरकार पाठिशी आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी लागणारे साहित्य आदी खरेदीसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याचे जाहीर केले होते. याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारने जिल्हा स्तरावर निधी उपलब्ध करुन दिला आहे.



**संवेदनशील विभागाला अधिकचा निधी**

नागरी संरक्षणाच्या दृष्टीने संवेदनशील नाशिक, ठाणे, पालघर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना प्रत्येकी एक कोटी तर इतर जिल्ह्यांना ५० लाख निधी वितरित केले आहे.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या तरतूदीनुसार मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. आपत्ती प्रसंगी प्रतिसाद देणाऱ्या यंत्रणांचे सक्षमीकरण करणे ही प्राधिकरणाची मुख्य जबाबदारी आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करत आपत्ती व्यवस्थापनांतर्गत आपत्तीमुळे निर्माण होणारे धोके व नुकसान कमी करण्यासाठी उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना, सौम्यीकरण उपाय, पूर्वतयारी व क्षमता बांधणी, प्रशिक्षण व जनजागृती, शोध व बचाव कार्य, आपत्ती व्यवस्थापना संबंधित कामे करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा स्तरावर निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

**...असा वाटप केला निधी**

- छत्रपती संभाजीनगर - ५० लाख रुपये
- जालना - ५० लाख रुपये
- बीड - ५० लाख रुपये
- धाराशिव - ५० लाख रुपये
- नांदेड - ५० लाख रुपये
- लातूर - ५० लाख रुपये
- परभणी - ५० लाख रुपये
- हिंगोली - ५० लाख रुपये

## मुंबईत फटाके वाजवण्यास बंदी

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणावामुळे ११ मे ते ९ जूनपर्यंत बृहन्मुंबईच्या हद्दीत फटाके, फटाके आणि रॉकेट वापरण्यास बंदी घालणारा आदेश मुंबई पोलिसांनी शनिवारी जारी केला.

महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ च्या XXI च्या कलम १० च्या उपकलम २ सह वाचलेल्या कलम ३३ च्या उपकलम (१) च्या कलम (यू) द्वारे मला मिळालेल्या अधिकारांचा वापर करून, मी अकबर पठाण, उप पोलिस आयुक्त (ऑपरेशन्स), बृहन् मुंबई येथे खालील आदेश देत आहे. ११ मे ते ९ जून (दोन्ही दिवस समाविष्ट) या कालावधीत बृहन् मुंबईच्या हद्दीत कोणत्याही ठिकाणी फटाके/फटाके वाजवू नयेत किंवा चिडीसह कोणताही रॉकेट उडवू नये, असे बृहन् मुंबईचे उपायुक्त (ऑपरेशन्स) अकबर पठाण यांनी एका पत्रात म्हटले आहे.



## वीर जवान एम. मुरली नाईक यांचा मुंबईत पुतळा उभारणार

**मुंबई :** वीर जवान मुरली नाईक यांना श्रद्धांजली अर्पण करत त्यांचे शौर्य अविस्मरणीय ठरेल यासाठी मुंबईत त्यांच्या पुतळ्याची उभारणी केली जाईल, असा शब्द नाईक कुटुंबियांना देण्यात आल्याचे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी एक्सवर पोस्ट केले आहे.

भारतमातेच्या रक्षणासाठी जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर कर्तव्य बजावत असताना घाटकोपर, कामराज नगर येथील वीर जवान एम. मुरली नाईक यांनी आपले प्राण अर्पण करत वीरमरण पत्करले. उद्योगमंत्री सामंत यांनी शनिवारी गावी भेट देत नाईक कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेत धीर दिला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत वीर जवान मुरली नाईक यांचे वडील श्रीराम नाईक यांचा व्हिडिओ कॉलद्वारे संवाद घडवून आणण्यात आला.

## ग्रामीण भागात विकासपर्व घडविणारी योजना

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** राज्यातील जल संपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि शेतीला पोषण देणारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दूरदृष्टी पूर्ण संकल्पना 'गाळ मुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना – महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात विकासाचे नवे पर्व घडवते आहे.

धरणात साचलेल्या गाळाचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करून त्याचा पुनर्वापर शिवारमध्ये करून जलसाठ्याची क्षमता वाढवली जाते आणि गाळातील पोषण मूल्य युक्त माती शेतजमिनीत वापरून जमिनीची सुपीकता सुधारली जाते. ही योजना विशेषतः अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे.

**वर्षभरात ४२.२९ कोटी घन मीटर गाळ उपसा**

१ एप्रिल २०२४ ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात १२७४ जल कुंभांतून एकूण ६६.९१ कोटी घनमीटर गाळ काढण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते, त्यापैकी ४२.२९ कोटी घन मीटर गाळाचे उत्खनन पूर्ण झाले असून, हे लक्ष्याच्या ६३ टक्के आहे. ही कामगिरी प्रशासनाच्या प्रभावी अंमलबजावणी बरोबरच शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शक्य झाली आहे.

गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार ही योजना अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वाची योजना आहे.

या योजनेच्या माध्यमातून धरणे, बंधारे आणि तलावांतील गाळ काढून त्या परिसरातील जमिनीवर टाकला जातो.शासन त्यासाठी निधी उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे शेतजमिनीची सुपीकता वाढते आणि पाणी साठवण क्षमता देखील सुधारते.

अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे मर्यादित संसाधने असतात, त्यामुळे त्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीच्या योग्य वापरामुळे थेट फायदा होतो. शासनाचा उद्देशही शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करणे व नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे आहे.

## 'टेक वारी' उपक्रमाचा समारोप

महाराष्ट्र जीत

**मुंबई,** :"माऊली... माऊली..."च्या जय घोषात, टाळ-मृदंगाच्या नादात आणि हरिभक्तीच्या भक्तीरसात न्हालेल्या वातावरणात मंत्रालयात पार पडलेल्या " टेक वारी: महाराष्ट्र टेक लर्निंग वीक" या अनोख्या उपक्रमाचा सांस्कृतिक कार्यक्रमाने समारोप झाला.

राज्याचे प्रशासनातील मनुष्यबळ अधिक तंत्र कुशल, गतिमान होण्यासाठी मंत्रालय व क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ५ ते ९ मे दरम्यान सामान्य प्रशासन विभागामार्फत टेक वारी आयोजन होते.

## मध्य रेल्वेवर आज मेगाब्लॉक

**मुख्य आणि हार्बर मार्गावर ब्लॉक | पश्चिम रेल्वे मार्गावर ब्लॉक नाही**

**मुंबई :** मध्य रेल्वेच्या मुख्य आणि हार्बर मार्गावर विविध अभियांत्रिकी आणि देखभालीची कामे करण्यासाठी रविवारी मेगाब्लॉक घेण्यात आला आहे. मुख्य मार्गावर माटुंगा ते मुलुंड अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी ११.०५ ते दुपारी ३.४५ वाजेपर्यंत ब्लॉक असेल. तर कुर्ला ते वाशी दरम्यान अप आणि डाऊन हार्बर मार्गावर सकाळी १०.४० ते सायंकाळी ४.४० पर्यंत ब्लॉक घेण्यात आला आहे.

पश्चिम रेल्वे मार्गावर शनिवारी (ता.१०) मध्यरात्री मेगाब्लॉक



घेण्यात आल्याने रविवारी दिवस कालीन ब्लॉक घेण्यात आलेला नाही.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.३६ ते दुपारी ३.१० वाजेपर्यंत सुटणाऱ्या डाऊन जलद मार्गावरील सेवा माटुंगा स्थानकावर डाऊन धीम्या मार्गावर वळवल्या जातील. या सेवा माटुंगा ते मुलुंड स्थानकांदरम्यान त्यांच्या संबंधित थांब्यांनुसार थांबतील आणि नियोजित वेळेपेक्षा १५ मिनिटे उशिराने पोहोचतील. तर ठाण्यापलीकडे जाणाऱ्या जलद गाड्या मुलुंड स्थानकावर डाऊन जलद मार्गावर पुन्हा वळवल्या जाणार आहेत. ठाणे येथून सकाळी ११.०३ ते दुपारी ३.३८ वाजेपर्यंत सुटणाऱ्या अप जलद मार्गावरील सेवा मुलुंड स्थानकावर डाऊन धीम्या मार्गावर वळवल्या जातील. या सेवा मुलुंड ते माटुंगा स्थानकांदरम्यान त्यांच्या संबंधित थांब्यांनुसार थांबतील.

## गिरिप्रेमीच्या जितेंद्र गवारे यांची मकालू मोहीम यशस्वी

**शिखरांवर चढाई करणारे ठरले पहिले महाराष्ट्रीय**

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** गिरिप्रेमीचे अनुभवी गिर्यारोहक जितेंद्र गवारे यांनी १० मे रोजी सकाळी ४.५० वाजता (स्थानिक वेळेनुसार) यशस्वीपणे माउंट मकालू (८,४८५ मीटर) शिखरावर यशस्वी चढाई केली. या पराक्रमासह ८ हजार मीटर उंचीच्या विविध सात शिखरांवर चढाई करणारे ते पहिले महाराष्ट्रीय गिर्यारोहक ठरले आहेत. त्याचबरोबर, नेपाळ हिमालयातील सर्व आठ-हजार मीटर शिखरांवर चढाई करणाऱ्या मोजक्या भारतीय गिर्यारोहकांमध्ये त्यांचा समावेश झाला आहे.

जितेंद्र यांनी माउंट एव्हरेस्ट, माउंट कांचनगंगा, माउंट ल्होत्से, माउंट धौलागिरी, माउंट मनासलू, माउंट अन्नपूर्णा-१ व आज माउंट मकालू अशा सात शिखरांवर चढाई केली आहे.

या सातत्यपूर्ण यशामागे त्यांची चिकाटी, कौशल्य आणि गिर्यारोहणाची निष्ठा आहे. त्यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाने शिवछत्रपती पुरस्कारने सन्मानित केले आहे.

या यशस्वी प्रवासामागे दिग्गज गिर्यारोहक आणि तेनसिंग नोर्गे राष्ट्रीय साहस पुरस्कारप्राप्त उमेश झिरपे यांचे मोलाचे मार्गदर्शन



लाभले आहे. या विशेष प्रसंगी उमेश झिरपे म्हणाले, "जितेंद्रची समर्पणाची भावना, नम्रता आणि शिस्त सदैव उल्लेखनीय राहिली आहे. आजचे त्यांचे यश केवळ वैयक्तिक नाही, तर महाराष्ट्राच्या गिर्यारोहण इतिहासातील एक सुवर्णक्षण आहे. त्याच्या या प्रवासात मार्गदर्शक होण्याचा मला अभिमान आहे."

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (DPU) यांनी जितेंद्र यांच्या मकालू मोहिमेस पाठबळ दिले. विद्यापीठाचे माननीय कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांनी विशेष पाठिंबा व प्रोत्साहन दिले. यामुळे हे स्वप्न प्रत्यक्षात उतरू शकले.

## कांदिवली येथे उद्योग वसाहतीत आग

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** कांदिवली (पश्चिम) येथील बोनांझा इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये शनिवारी सकाळी ७ वाजता भीषण आग लागली. तब्बल ६ तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली. दरम्यान या दुर्घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही.

कांदिवलीच्या औद्योगिक वसाहतीतील दोन मजली इमारतीत सकाळी ७ वाजता आग लागली होती. मुंबई अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले. अग्निशमन दलाने सकाळी ७.३० च्या सुमारास आग श्रेणी २ ची असल्याचे घोषित केले. दोन मजली औद्योगिक इमारतीच्या

**बोनांझा इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये जीवितहानी नाही**



पहिल्या मजल्यावरील गाळ्यात आग लागली होती. आगीमुळे घटनास्थळी धुराचे साम्राज्य पसरले होते. आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी तीन छोट्या होज लाईन्स आणि एक उच्चदाबाची लाईनचा वापर करण्यात आला. दुपारपर्यंत आग सर्व बाजूंनी आटोक्यात आणण्यात आली आहे, अशी माहिती अग्निशमन दलाने दिली.

घटनास्थळी पालिकेचे कर्मचारी, पोलीस, अदानी इलेक्ट्रिसिटी, १०८ रुग्णवाहिका व सार्वजनिक बांधकाम विभागाची पथके दाखल झाली. आग विझवण्यासाठी ६ फायर इंजिन, २ फायर टेंडर, ६ मोठे टँकर असा ताफा तैनात होता. या आगीत कोणीही जखमी नसल्याची माहिती पालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

## विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार वितरण मंगळवारी

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** कामगार विश्वात प्रतिष्ठेच्या असलेल्या कामगार भूषण पुरस्कार आणि विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारांचे येत्या मंगळवारी (१३ मे) वितरण करण्यात येणार आहे. राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते राज्यातील ५२ कामगारांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, कामगार मंत्री अॅड.आकाश फुंडकर, विधान परिषदेच्या उपसभापती निलमताई गोऱ्हे, कामगार राज्यमंत्री अॅड.आशिष जयस्वाल, सर्व स्थानिक खासदार व आमदार तसेच कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, विकास आयुक्त तुकाराम मुंढे, कामगार आयुक्त डॉ.एच.पी.तुम्मोड, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे आदी मान्यवर उपस्थित असतील.

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे सायंकाळी पाच वाजता पुरस्कार वितरण सोहळ्यास सुरुवात होईल.

## प्रलंबित प्रकरणे निकाली निघणार

**म्हाडाचा १३ मे रोजी लोकशाही दिन**

महाराष्ट्र जीत

**मुंबई :** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) अकरावा लोकशाही दिन मंगळवार १३ मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. 'म्हाडा'च्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात चौथ्या मजल्यावरील सभागृहात दुपारी १२ वाजेपासून उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली हा दिन होईल. यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या लोकशाही दिनामध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

जानेवारी-२०२४ पासून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयातील सभागृहात म्हाडा लोकशाही दिन आयोजित करण्यात येत आहे. आतापर्यंत म्हाडामध्ये दहा लोकशाही दिनाचे यशस्वी आयोजन म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले आहे. लोकशाही दिनांतर्गत नागरिकांच्या तक्रारींवर संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत थेट व खुली चर्चा केली जाते. यामुळे वर्षानुवर्ष प्रलंबित प्रकरणे तात्काळ निकाली निघाली असून नागरिकांना सुलभ, पारदर्शक आणि त्वरित न्याय मिळत आहे. या उपक्रमामुळे लोकशाही दिन नागरिकांच्या हिताचा बनू लागला आहे.

नागरिकांनी आपल्या तक्रारी अथवा प्रश्न लोकशाही दिनामध्ये उपस्थित करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपील्स, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे / देण्यात येणार आहे अशा प्रकरणाची पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे नसेल असे अर्ज म्हाडा लोकशाही दिनात स्वीकारले जाणार नाहीत, असे प्रशासनाने कळविले आहे.

**लग्नसमारंभ, अन्य कार्यक्रमासाठी मिळतात उत्तम दर्जाचे दागिने**

# पारंपरिक दागिन्यांसाठी प्रसिद्ध कीर्तिकर मार्केट

महाराष्ट्र जीत **मुंबई**

हल्ली तरुणींमध्ये 'जून ते सोन' या म्हणीचा ट्रेंड सुरू आहे. मध्यंतरी जुन्या पारंपारिक दागिन्यांच्या जागेवर नवीन डिझाईनर नेकलेस, हिऱ्यांच्या दागिन्यांचे तरुणीना, महिलांना आकर्षण वाटत होते. परंतु, काळाच्या बदलत्या चक्रात तरुणीची आवडही बदलेली आहे. सध्या तरुणींमध्ये पारंपारिक पद्धतीचे दागिने परिधान करून फॅशन करण्याचा ट्रेंड आहे. आणि




त्यांच्या या आवडीचे पारंपारिक दागिने केवळ मुंबईतील कीर्तीकर मार्केट मध्ये मिळतात. त्यामुळे याठिकाणी विविध ठिकाणावरून आलेल्या महिला आणि तरुणीची मोठ्या संख्येने गर्दी पाहायला मिळते. म्हणूनच या मार्केटमध्ये अन्य दिवशी लाखोंची आणि सणावाराला करोडोंची उलाढाल होत असते.

सणवार किंवा लग्नघटिका समीप आली की अनेक तरुणींचे, महिलांचे पाय आपसूकच दादर येथील कीर्तीकर मार्केटच्या दिशेने वळतात. मोत्यांचे दागिने, सोन्याचे पाणी चढवलेले दागिने, बॅनटेक्सचे दागिने आणि हिरेजडित रत्नांचे दागिने हे या बाजारात मिळतात. यामध्ये नथ, बांगड्या, कर्णफुले,



मोत्यांचे आणि सोन्याचे पाणी चढवलेले गळ्यातले जसे की, बेलपान, वज्रटीक, चंद्रहार, बोरमाळ, लक्ष्मीहार, ठुशी, चिंचपेटी, तनमनी, तोडे, पिछोडी, पैजण, विविध प्रकारचे बुगडी, मंगळसूत्र, चेन, नेकलेस आणि सध्या ट्रेंड मध्ये टेम्पल ज्वेलरी या ठिकाणी अनेक प्रकार आणि डिझाईन मध्ये उपलब्ध आहेत.

कीर्तीकर बाजारात दागिन्यांचे दरही कमी करता येतात. त्यामुळे आम्ही या बाजारातूनच दागिने खरेदी करतो. असे या बाजारात लग्नाची खरेदी करण्यासाठी आलेल्या प्रिया धुमाळ यांनी सांगितले.

चित्रपट, नाटक आणि मालिकांमध्ये नायिकानी वापरलेले सर्व दागिने या ठिकाणी कमी दरात मिळतात. तसेच, या ठिकाणी एका दागिन्यांचे किमान १०० प्रकार तरी पाहायला मिळतात. आणि इथे येणाऱ्या महिला आवडीनुसार एका दागिन्यांचे अनेक डिझाईन विचारतात, असे येथील दुकानदार सोनू शहा यांनी सांगितले.

**...असे आहेत दागिन्यांचे दर**

- मंगळसूत्र : १०० रुपयांपासून ते २० हजार रुपयांपर्यंत
- कानातले : ५० रूपयांपासून ते १,५०० रुपयांपर्यंत
- नथ : ५० रुपयांपासून ते २०० रुपयांपर्यंत
- मोत्यांचे दागिने : ९० रुपयांपासून ५ हजार रुपयांपर्यंत
- १ ग्राम सोन्याचे दागिने : १,५०० रुपयांपासून ते २० हजार रुपयांपर्यंत
- टेम्पल ज्वेलरी : ४,५०० रुपयांपासून ते १५ हजार रुपयांपर्यंत
- बांगडी : १०० रुपयांपासून ते २ हजार रुपयांपर्यंत
- मोती बांगडी : ८० रुपयांपासून पासून २ हजार रुपयांपर्यंत
- कानवेल : १५० रूपयांपासून २,५०० रुपयांपर्यंत
- कोपा : २५० रुपयांपासून ते ३,५०० रुपयांपर्यंत
- हिऱ्यांचे दागिने : ७०० रुपयांपासून १५ हजार रुपयांपर्यंत

## संपादकीय

# आता नव्या उमेदीने लढा..!

तीन वर्षांहून अधिक काळ रखडलेल्या महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे मोकळा झाला आहे. पुढील चार महिन्यांत या निवडणुका व्हायच्या आहेत. यामध्ये महापालिका, जिल्हा परिषदा, नगरपालिका, पंचायत समिती या सर्वच पातळ्यांवरील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार चार आठवड्यांच्या आत या निवडणुकांची अधिसूचना जारी करावी लागणार आहे आणि नंतर चार महिन्यांच्या आत प्रत्यक्ष निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. त्यामुळे पावसाळ्याचे कारण देऊन या निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता नाही.

याआधी करोना काळामुळे ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची मुदत संपली होती तेथे होणार्या निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या, त्यानंतरच्या काळात ओबीसी आरक्षणाचा विषय पुढे आला आणि त्यामुळे या निवडणुका न्यायालयीन प्रक्रियेत अडकल्या. मार्च २०२२ मध्ये या निवडणुकांना स्थगिती मिळाली आणि तेव्हापासून निवडणुकांचे हे भिजत घोंगडे तसेच पडले होते. पण आज अचानक सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय आल्याने आता स्थानिक पातळीवरील सर्व कारभार तेथील लोकनियुक्त प्रतिनिधींच्या हातात जाणार आहे ही दिलासाजनक बाब आहे.

या सगळ्या प्रक्रियेत राज्य शासन या निवडणुका घ्यायला फार उत्सुक नव्हते किंवा शक्य होईल तेवढ्या त्या लांबणीवर टाकण्याच्याच प्रयत्नात होते असा आरोप वारंवार झाला आहे. लोकनियुक्त सभासदांची मुदत संपल्यानंतर सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांचे कारभार मुख्य अधिकारी किंवा आयुक्तांच्या हातात गेले आणि त्यांना हाताशी धरून राज्य सरकारने मनमानी केली आणि नको असलेली कामे त्या त्या शहरांवर लादली गेली असाही एक आरोप आहे. मुंबई महापालिकेत प्रशासकांची राजवट असल्याने तेथेही हजारो कोटी रुपयांची उधळपट्टी झाल्याचा आरोप उद्धव ठाकरे गटाच्या नेत्यांनी वेळोवेळी पत्रकार परिषदा घेऊन केला आहे.

तेथे मुंबई महापालिकेची सर्रास लूट केली गेली असे त्यांचे म्हणणे आहे. पुण्यातही अशाच प्रकारची लूट झाल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केला आहे. त्यांनी म्हटले आहे की पुणे महापालिकेच्या तीन वर्षांपासूनच्या अधिकच्या प्रशासकाच्या राजवटीत हजारो कोटी रुपयांची नको असलेली कामे केली गेली आणि ती राज्य सरकारच्या मर्जीतल्या ठेकेदारांना दिली गेली. त्यातून पुणे महापालिकेची ही लूट झाली आहे.

या कालावधीत पुणे महापालिकेवर तब्बल दहा हजार कोटी रुपयांचे जादाचे कर्ज झाले आहे, असे प्रशांत जगताप यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आता निवडणुका होऊनही महापालिकेवर निवडून येणार्या लोकप्रतिनिधींना मनासारखे काम करता येणार नाही, कारण हा कर्जाचा बोजा कसा उतरवायचा हा मुख्य प्रश्न त्यांच्या पुढे असणार आहे. पुणे मुंबईच नव्हे तर राज्यातल्या अन्य मोठ्या शहरातील महापालिकांमध्येही असाच प्रकार झाल्याचा दावा केला जात आहे. महापालिकेचा कारभार प्रशासकाच्या हातात राहिल्याने त्याला हाताशी धरून राज्य सरकारला हवी तिथे मनमानी करता आली असे सर्वसाधारण तक्रारीचे स्वरूप आहे, पण आता मात्र वातावरण मोकळे होणार असून पुढील चार महिन्यांत लोकनियुक्त सदस्यांच्या हातात स्थानिक प्रशासनाचा कारभार जाणार आहे.

अर्थात, महापालिका किंवा अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात निवडून येणारे सर्वच लोकप्रतिनिधी अगदी धुतल्या तांदळासारखे असतात असे कोणीही म्हणणार नाही, त्यांच्याकडूनही त्या त्या पातळीवर काही गडबड होत असतेच, पण यातला महत्त्वाचा भाग असा की शहरातल्या प्रत्येक बारीक सारीक कोपर्याला आता प्रशासनाच्या कारभारात महत्त्व मिळेल आणि त्यांची तेथे अडलेली कामे मार्गी लागतील. ओबीसी आरक्षण या एका महत्त्वाच्या मुद्द्यावर या निवडणुका रखडल्या होत्या.

या निवडणुकांच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयात एकूण सुमारे ३३ याचिका दाखल आहेत, त्या याचिकांवरील अधिकृत निर्णय अद्याप यायचा असला तरी निवडणूक मात्र त्याच्या आधीच होणार आहे. त्यामुळे यापूर्वी झालेल्या निवडणुकातील आरक्षणानुसार आणि प्रभाग रचनेनुसार या निवडणुका होतील हे स्पष्ट आहे. पुण्यात चार वॉर्डाचा प्रभाग या हिशेबाने निवडणुका होणार आहेत, असे सांगितले जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातही पक्षीय राजकारणाला महत्त्व असतेच. त्यामुळे आता पुढच्या काही महिन्यांचे वातावरण हे स्थानिक व पक्षीय राजकारणातून ढवळून निघणार आहे.महायुती आणि महाविकास आघाडी असा सरळ सामना याही निवडणुकीत दिसणार असला तरी युती किंवा आघाडी यामध्ये स्थानिक पातळीवर वेगवेगळी समीकरणे असल्याने तेथे युती किंवा महाविकास आघाडी कायम राहण्याची कितपत शक्यता आहे याविषयीही शंका आहे. तूर्तास आता नागरिकांनी मात्र त्यातल्या त्यात बरा आणि सक्षम उमेदवार निवडून देण्याला फार महत्त्व आहे. स्थानिक राजकारणात गुंडांचा शिरकाव होणार नाही, भ्रष्टाचार्यांना मुक्त वाव मिळणार नाही याची खबरदारी आता नागरिकांना घ्यावी लागेल तरच, त्यांचा शहराचा कारभार काही अंशी तरी चांगला चालू शकणार आहे.

# बाल लैंगिक शोषण आणि आपण

महाराष्ट्र जीत

समाजात विविध स्तरात खूप मोठ्या प्रमाणात लहान मुलामुलींचे लैंगिक शोषण होत आहे. या शोषणाचे मुलामुलींवर मानसिक वा शारीरिक परिणाम होत आहेत. पुढे लैंगिक सुख उपभोगण्यास अडचणी येऊन काहींना नैराश्याचा सामना सुध्दा करावा लागत आहे. काहींमध्ये तर कायमस्वरूपी असुरक्षितपणाची भावना निर्माण होत आहे. अशा वेळी पालकांनी या विषयातल्या काही गोष्टी समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, लैंगिक शोषण फक्त लहान मुलींचे होते असे नाही, तर अनेक वेळा लहान मुलांचेही लैंगिक शोषण होत असते. दुसरे म्हणजे, शोषण करणारी व्यक्ती अनेक वेळा परिचित असलेली असते. एखादी जवळच्या नात्याची व्यक्ती, शेजारी, मूल शाळेला जात असेल तर रस्त्यातील परिचित व्यक्ती, शिक्षक इत्यादी. अर्थात, लहान मुलांचे लैंगिक शोषण होत असेल तर अनेक वेळा त्यांना ते घरच्यांना कसे सांगायचे हे कळत नाही. कारण १) त्यांना तक्रार करतांना योग्य ते शब्द ठाऊक नसतात. २) कृतीचे वर्णन करता येत नाही. ३) शोषण करणारी व्यक्ती त्यांचे खूप लाड



करते म्हणून त्यांना तिच्याविरुद्ध काही बोलावेसे वाटत नाही. ४) काही वेळा शोषण करणा–या व्यक्तीने त्या मुला–मुलींच्या मनात दम/भीती भरवलेली असते. म्हणून लहान मुला–मुलींना ‘गुड टच’ आणि ‘बॅड टच’ (चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श) हे वयाच्या पाचव्या वर्षापासून शिकवणे आवश्यक ठरते. याशिवाय लहान मुला/मुलींना हे समजून सांगणे आवश्यक आहे, की अंघोळ घालणारी वडीलधारी व्यक्ती सोडून कोणीही बमवर हात लावणे, चड्डी काढणे, चड्डीत हात घालणे, मोठ्या मुलांनी/पुरुषांनी समोर चड्डी काढणे, लिंगाला हात लावायला लावणे हे सर्व लैंगिक भूक दर्शवणारे स्पर्श आहेत. असे जर घडत असेल तर विश्वासातील वडीलधा–या व्यक्तीस सांगणे अत्यंत गरजेचे आहे. अर्थात, विश्वासातील व्यक्तीने मुला/मुलीने सांगितलेली तक्रार गांभीर्याने समजून घेणेही तितकेच गरजेचे आहे. जर तक्रार खरी असेल तर संबंधित व्यक्तीला जाबही विचारला गेला पाहिजे. अनेक पालक हे करत नाहीत, कारण ओळखीच्या व्यक्तीला अशा विषयाबद्दल कसे काय बोलायचे, गावभर झाले तर इज्जत जाईल, ही भीती त्यांना असते. पण जर तुम्ही त्या व्यक्तीच्या समोर गेला नाहीत, जाब विचारला नाहीत, तर ती व्यक्ती आणखी निर्ढावते आणि मुलांना कळते की आपण तक्रार करूनही काही उपयोग नाही आणि ते मग चूपचाप शोषण सहन करत राहतात. जर असे लैंगिक शोषण झाले तर मुलाला/मुलीला हा विश्वास दिला पाहिजे की त्याचा/तिचा काहीही दोष नाही; चूक शोषण करणा–याची आहे. असे सांगितले नाही तर मुलांमध्ये अपराधीपणाची भावना निर्माण होऊ शकते की, ‘आपण हे कसे होऊ दिले?’ अशा प्रकारची परिस्थिती उद्भवते तेव्हा हे ध्यानात ठेवले पाहिजे की पोलिस खात्यात लहान मुलांसाठीचा ‘स्पेशल सेल’ ( बाल पोलीस पथक) असतो. अशा सेलमध्ये काम करणा–या पोलिसांशी संपर्क साधून तुम्ही त्यांची मदत घेऊ शकता. परंतु लहान मुलांचे लैंगिक शोषण होत आहे याची काही लक्षणे असतात. ही लक्षणे म्हणजे पुरावा नक्कीच नाहीत, पण अशी लक्षणे दिसली तर जास्त लक्ष द्यावे, शहानिशा करावी. चड्डीत रक्ताचे डाग, जननेंद्रियांवर जखमा, झोपेत लघवी होणे, घर सोडून पळून जायची इच्छा व्यक्त करणे, आवडती गोष्ट (आइस्क्रीम, चॉकलेट इ.) नावडती होणे, एखाद्या व्यक्तीपासून दूर राहायचा प्रयत्न करणे, खेळात मन न लागणे, मुले एकदम खूप आज्ञाधारक होणे आदी. अर्थातच ती सर्वांमध्ये दिसतीलच असे नाही. आणि म्हणून पालकांनी लहान मुलांना ‘गुड टच’ आणि ‘बॅड टच’ यामधला फरक समजावून सांगणे आवश्यक आहे. त्यांनी ही शिकवण परत–परत मुलांना दिली पाहिजे. बालकांच्या न्यायीक हक्काचे उल्लंघन होत असल्यास चाईल्ड हेल्पलाईन १०९८ वर संपर्क साधून माहिती दिली पाहिजे. आपण नोंदविलेली तक्रार ही पुर्णपणे गोपनीय असते. बालकांच्या न्यायीक हक्कासाठी आपण सर्वांनी पुढाकार घ्यायला हवा. कारण आजची बालके ही भविष्यातील भारत निर्माते आहेत.

**शब्दसंकलन**
**विनोद भिमराव पट्टेबहादुर**
**सदस्य, बाल कल्याण समिती, वाशिम**
**मु. सिव्हील लाईन, वाशिम**

# वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहन चालकांवर दंड

महाराष्ट्र जीत

**राहुरी :** राहुरी फॅक्टरी येथे वारंवार वाहतूक जाम होत आहे याचे मूळ कारण म्हणजे बरेचसे वाहनचालक विरुद्ध दिशेने चालवतात. त्यामुळे वाहतूक खोळंबली जाते. त्यामुळे संपूर्ण महामार्गावर वाहतुकीची कोंडी होते. काल या वाहतुकीच्या कोंडीचा फटका खुद्द पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना बसला व त्यांनी रस्त्यावर येऊन वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. यावेळी राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी ताबडतोब राहुरी फॅक्टरी येथे येऊन वाहतूक सुरळी करण्यासाठी प्रयत्न केले. व त्याचबरोबर वाहतुकीच्या विरुद्ध दिशेने वाहने चालवून वाहतूक ठप्प करणाऱ्या दोन वाहनचालकांवर राहुरी पोलीस स्टेशनच्या वाहतूक विभागाने मोटर व्हेईकल कलम १२२,१७७,१८४ नुसार कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये सुमारे पाच हजार रुपयांपर्यंत दंड व सहा महिने ते एक वर्षापर्यंत कारावास होऊ शकतो. अशा कलमांन्वये कारवाई करून नागरिकांना आव्हान केले की कोणीही वाहतुकीच्या विरुद्ध दिशेने गाडी चालून वाहतुकीला अडथळा होईल असे वर्तन करू नये व वाहतुकीस अडथळा करू नये. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलबुरमे उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक फुलारी, पोलीस हवालदार संतोष ठोंबरे, पोलीस हवालदार फुलमाळी, सचिन ताजणे , प्रमोद ढाकणे ,अंबादास गीते ,गणेश सानप यांच्या पथकाने केली आहे.

# गुन्हे शाखेच्या पोलिसांना तात्काळ निलंबित करा ! तीव्र आंदोलन

महाराष्ट्र जीत

**नेवासा :** नेवासा – शेवगांव राज्य मार्गावरील भेंडा शिवारात असलेल्या हॉटेल अमित येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी घरगुती जेवनाच्या हॉटेलवर धाड घालून हॉटेल चालकाला 'तु येथे दारु विकतो' असे म्हणून नगरच्या पाच गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांनी हॉटेल चालकासह हॉटेलात काम करणाऱ्या महिलांना जबर हाणमार केली. यामध्ये चार पुरुष व दोन महीला पोलिसांच्या या मारहाणीत गंभीर जखमी झाल्याची घटना भेंडा येथे घडलेली. जखमींवर जिल्हा रुग्णालयात उपचार केल्यानंतर संतप्त हॉटेल चालकांसह गावकऱ्यांनी नेवासा पोलीस ठाण्यात धाव घेवून नगरच्या गुन्हे शाखेतील पोलीस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची एकमुखी मागणी केली. याबाबत लवकरच राज्य महीला आयोगाकडे या गंभीर घटनेची तक्रार दाखल करण्यात येणार असल्याची माहीती महेश वाघडकर यांनी दिली. जिल्हा पोलीस अधिक्षक राकेश ओला यांना वाघडकर कुटूंबियांकडून याबाबत निवेदन देण्यात आले. त्यामुळे नगरच्या गुन्हे शाखेच्या पोलिसांचा प्रताप नुकताच चव्हाट्यावर आला. याबाबत अधिक सविस्तर वृत्त असे की सोमवार (दि.७) रोजी दुपारी एक वाजेच्या सुमारास हॉटेल अमित येथे ग्राहक जेवन करत असतांना एका पांढऱ्या रंगाच्या चार चाकी गाडीतून तीन लोक साध्या गणवेशात गाडीतून खाली उतरले. त्यांनी आल्याबरोबर हॉटेलाच्या चारही बाजूंनी उचका – पाचक सुरु केली असता त्यावेळी हॉटेल चालकांनी 'तुम्ही कोण आहात?' व उचका – पाचक का करता? अशी विचारणा केली असता हॉटेल काऊंटरवर बसलेल्या महेश वाघडकर याला गुन्हे शाखेच्या पोलीसांनी 'तु येथे दारु विकतो? असे सांगितले. 'आमचे हे घरगुती जेवनाचे हॉटेल आहे, येथे आम्ही येथे दारु विकत नाही आणि पिवू पण देत नाही? असे हॉटेल चालक महेश वाघडकर यांनी गुन्हे शाखेच्या पोलीसांना सांगितले. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पोलिसांचा चांगलाच पारा चढला. पोलीस साध्या गणवेशात असल्यामुळे ते पोलीस नसल्याचा संशय आल्याने वाघडकर यांनी 'तुम्ही कोण आहात' अशी विचारणा या पोलीसांना केली. गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार ओंकार फोलाने यांनी हॉटेल चालकाच्या जोरदार कानसुळात मारली आणि त्याला हॉटेलच्या बाहेर ओढत हॉटेलचे सीसीटी कॅमेऱ्याचे तोंड दुसरीकडे फिरवून जबर मारहाणीचा रट्टा सुरु केला. तर गुन्हे शाखेच्या आकाश काळे या पोलीस कर्मचाऱ्याने या हॉटेल चालकातून 'तु १५ देशी दारु व इंग्लीश दारुच्या सिलबंद बाटल्या दे' नाहीतर तुझ्यावर कारवाई करु, अशी धमकी दिली. हॉटेल चालकांनी नकार दिल्यामुळे आणखी मारहाण करण्यात आली. महेश वाकडकर यांनी घडला प्रकार घरी सांगून 'तुम्ही लवकर हॉटेलकडे याकडे या' असे घरच्यांना सांगून घरची मंडळीही हॉटेलकडे बोलावून घेतले. पोलिसांनी त्यांचेही ऐकले नाही. कुटूंबीयांसह मध्यस्थींनाही चांगलीच मारहाण केली. हॉटेल मधील कामगार महिलांनीही मारहाण सोडविण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांनाही पोलिसांनी मारहाण केली.

मारहाणीत चार महीला आणि दोन पुरुष गंभीर जखमी झालेले असून त्यांनी नगरच्या जिल्हा रुग्णालयात उपचार घेवून आल्यानंतर नेवासा पोलिसांकडे धाव घेत नगरच्या गुन्हे शाखेच्या पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. महिलांना मारहाण करण्यात आल्यामुळे याची तक्रार राज्य महीला आयोगात दाखल करणार असल्याचे वाघडकर यांनी सांगितले.

# ग्रामपंचायत कारभाराविषयी पुणतांबेकरांची सावध भूमिका

महाराष्ट्र जीत

**पुणतांबा :** पुणतांबा ग्रामपंचायतीच्या कारभारा विषयी ग्रामपंचायती च्या एका विद्यमान सदस्यानेच पोलखोल केल्यानंतर काल संपूर्ण दिवसभर गावात कारभाराविषयी उलट सुलट चर्चा सुरु होती. विशेष म्हणजे ग्रामपंचायती तील गैरव्यवहार कसा चालत आहे. याची बरीच माहिति बहुतांशी ग्रामपंचायत सदस्य यांना माहिती होती ग्रामपंचायतीत १७ सदस्या पैकी आ. आशुतोष काळे गटाचे ४ ना. विखे गटाचे ४ तर विवेक भैय्या कोल्हे गटाचा सरपंच व इतर सदस्य आहेत विरोधी गटाच्या एका सदस्याने गैरव्यवहार व अनियमीतचे प्रकरण उघड्यावर आणले व इतर सदस्यांनीही मासिक बैठक व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांसमोर वेळोवेळी ही बाब निर्दशनास आणून दिली मात्र दखल घेतली नाही. ग्रामपंचायतीच्या कारभारात दोन–तीन जणांना च जास्त हस्तक्षेप आहे तेच इंजिनिअरला हाताशी धरून कामे काढतात बिले काढतात विरोधकांना बैठकीत बोलू देत नाही मनमानी करतात असा आरोप काही सदस्यांनी तूर्त नाव न छापण्याच्या अटीवर केला आहे आम्हाला ग्रामस्थांनी सत्ता दिली आहे. विरोधकांनी तक्रारी करायच्या तर बिनधास्त करा काही होणार नाही असे सत्ताधारी म्हणतात अशी प्रतिक्रिया अनेकांनी दिली आहे. ग्रामपंचायतीची घरपट्टी पाणीपट्टी ४ कोटी पर्यंत थकित आहे. कर्मचाऱ्यांचे पगार नाही, मात्र कामाचा धडाका सुरु आहे अव्वाच्या सव्वा बिले काढली जातात. अंदाधुंदी कारभार सुरु आहे ग्रापंचायतीच्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त आहे. कर्ज वाढेल असे एका सदस्याने निर्दशनास आणले असता महाराष्ट्र सरकारच कर्जाचा डोंगर आहे. ग्रामपंचायतीचे आम्ही बघू तुम्ही सल्ला देऊ नका असे सत्ताधाऱ्याचे नेत्याने स्पष्ट केल्याचे समजते एकूणच ग्रामपंचायत कारभाराच्या गैरव्यवहाराबाबद आता चर्चा नव्हे तर चौकशी करण्यात आली आहे. चौकशीत नेमके काय बाहेर येणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे, तर येत्या १० दिवसात गैरव्यवहाराचे आणखी काही प्रकरणे बाहेर काढण्याचे काही सदस्यांनी स्पष्ट केले आहे.

# कामगार कल्याण मंडळाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा : अनिल बोरसे

महाराष्ट्र जीत

**कुकाणा :** महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळाकडून कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन कामगार कल्याण मंडळ,अहिल्यानगर केंद्राचे केंद्र संचालक अनिल बोरसे यांनी केले. नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना कामगार कल्याण केंद्रात कारखान्याचे स्टोअर किपर नामदेव मुळे यांचे अध्यक्षेतेखाली झालेल्या कामगार कल्याण योजना प्रचार प्रसार व कामगार मेळाव्यात मार्गदर्शन करतांना श्री.बोरसे बोलत होते. मंडळाकडून राबविन्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती त्यांनी यावेळी दिली.




कामगार संचालक सुखदेव फुलारी,कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, कृष्णा महाराज उगले, कामगार पतसंस्थेचे संभाजी भुसारी, संजय वांढेकर, सचिन मरकड,अशोक धुमाळ,रामकिसन माने,दादासाहेब मरकड,नामदेव सावंत, अशोक शेटे,प्रसाद भुसारी,अमोल लोखंडे, अशोक निकम,संकेत पवार, समर्थ फटांगरे,सुनिल नागवडे आदि यावेळी उपस्थित होते. कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, नामदेव मुळे, कृष्णा उगले व प्रसाद भुसारी यांनी ही मनोगत व्यक्त केले. कामगार कल्याण केंद्र चालक पोपटराव उगले यांनी प्रास्ताविक केले.सचिन मरकड यांनी आभार मानले.

# आईच मातृप्रेम

सर्वप्रथम मातृदिनाच्या खूप खूप शुभेच्छा. मी जेव्हा लहान होती तेव्हा शाळेत निबंध लिहिली होती. आज परत मातृदिनाबद्दल थोडसं बोलू इच्छिते. आई या दोन वाक्यातच देव आहे. आई ही दुधावरच्या साईप्रमाणे असते. अगदी कोमल आणि नरम असते . कितीतरी वेदना सहन करणारी ती म्हणजे आई असते. लेकरांवर निस्वार्थपणे प्रेम करते. नऊ महिने नऊ दिवस बाळाला गर्भात ठेवून जन्म देते, ती म्हणजे आई. आई बद्दल जेवढे बोलावं तेवढं कमीच पडेल. मी प्रत्येकांना सांगू इच्छिते की, अरे आईची आई होऊन बघा.. ना...! कधीतरी. मग तुम्हाला समजेल की मातृप्रेम काय असते. आई ही आई असते. आईची जागा कधीच कोणी घेऊ नाही. आई मुलांवर खूप चांगले संस्कार करते.

असं कधी झालंय काय मुलं आधी उठले आणि आई नंतर नाही...! ना....! आधी मुलांना जेवण घालते. , नंतर आई जेवते. स्वतःच्या आधी मुलांचा विचार करणारी ती म्हणजे आहे. आपल्या प्रत्येक अडचणीला धावून येणारी म्हणजे आईच असते. आपल्याला काय हवं...नको ... आपली काळजी घेणारी... ती म्हणजे आहे. मला मान्य आहे की आईचं कर्तव्य असते, मुलांची काळजी घेणे आणि मुलांवर चांगले संस्कार देणे. पण मुलांचे देखील कर्तव्य आहे. ना...! की, आपल्या आईची काळजी घेणे. आपल्या आईला विचारणे तू कशी आहेस, आणि तुझी तब्येत कशी आहे म्हणून. मुलांना आपल्या आईचं मातृप्रेम कळलं पाहिजे. अरे एकदा त्या आईच्या कुशीत जाऊन बघा... मग तुम्हाला मातृप्रेम दिसेल. तुम्हाला पूजा करायची आहे ना...! तर ,मंदिरात जाण्यापेक्षा घरी असलेल्या आईची पूजा करा...! देव असं म्हणत नाही की, तुम्ही आधी मंदिरात या म्हणून...! देव असं म्हणतो की " मी प्रत्येक ठिकाणी आपली मदत करायला येऊ शकत नाही. म्हणून देवाने आईला पाठविले आपल्या मदती करता." म्हणून आपण आधी आपल्या आईचा आदर, सन्मान केला पाहिजे . मग माझ्या दर्शनाला या. मुलांच्या डोळ्यात अश्रू आले की आईच्या डोळ्यात आपोआपच अश्रूंच्या धारा वाहू लागतात . यालाच तर म्हणतात मातृप्रेम. मी प्रत्येकांना सांगू इच्छिते की कधीतरी आईची आई होऊन वागा ना... आपल्या आईला कधी दुखावू नका. आई जे म्हणेल ते करा. कारण आपल्यासाठी काय योग्य आहे? ते आपल्यापेक्षा आपल्या आईला जास्त कळते. माझंचं बघा ना...!माझे सर्व निर्णय माझी आई घेत असते... कारण तिला सर्व कळते. मी काय ...करावं आणि काय नको... ती एक उत्तम लेखिका आहे... आजपर्यतचे आमचे सर्व निर्णय ती स्वतः घेऊन आमच्या पाठीशी खंबीर उभी आहे. माझ्यासाठी माझी देव म्हणजे माझी आई..खरं सांगायचं म्हणजे, आपण देवाकडे असे कधी मागितले काय? की माझ्या आईची काळजी घ्या... आणि माझ्या आईला सुखात ठेवा ....!कधीतरी मागून बघा. मुलगा किंवा मुलगी कितीही मोठे झाले तरी आपल्या आईसाठी लहानच असतात. आपण जगाच्या पाठीवर कुठेही जाणार तरी आईची ममता आपला खुशीतच दिसून येईल.

मला एकच सांगायचं आहे आपण कितीही मोठी गरुड झेप घेतली आणि कितीही मोठी प्रगती केली. तरी आपल्या आईला कधीच विसरायचं नाही. कारण ती होती म्हणून आज आपण इथपर्यंत येऊ शकले. आणि आई आपल्यासाठी जेवढं करते तेवढं कोणीच करू शकत नाही. मुलं आपल्या आईचे उपकार कधीच फेडू शकत नाही. म्हणून मी सांगते आपल्या आईला जपा. तिचा आदर, सन्मान करा. आपण लहान होतो तेव्हा ती आपल्याला फुलासारखी जपायची...! मग आपण मोठी झाल्यावर आपलं देखील काम आहे. तिला फुलासारखं जपलं पाहिजे. हे प्रत्येक मुलांनी केलं पाहिजे.आई कितीही रागविली तरी, तिच्या रागातच ममत्व असते. आपल्याला सगळ्यात आधी प्राधान्य द्यायचं असेल, तर आपल्या आईला दिला पाहिजे. कारण आईसारखे दुसरे दैवत कोणीच असू शकत नाही ..! आपणांस एक उदाहरणार्थ सांगायचं झाले, आपल्याला महाराष्ट्रातील प्रसिद्ध नेत्र सर्जन पद्मश्री डॉ.तात्या लहाने,यांच्या



दोन्ही किडण्या निकामी झाल्या होत्या ...तेव्हा त्यांच्या आईनं त्यांना आपली एक किडनी दिली. आणि त्यांना जीवनदाना दिले. हिच खरी आई...आपल्या त्या आईने हा विचार केला, नाही मी कशाला देऊ ...पण मला काहीही झाले तरी चालेल ...माझा लेकरू वाचला पाहिजे ..! माझ्याही बाबतीत असच एकदा झाले होते मी बारावीला असताना ...कोरोना सुरूच होता ...आणि अँनलाईन क्लास करावे लागायचं ..माझ्या डोळ्यांना खूप त्रास होत होता ...अचानक एके दिवशी माझ्या डोळ्यांच्या बाहुल्या वर जायला लागले. मी समोर बघितले तरी ते वर दिसायचे आणि मला भीती वाटली ...मला माझी आई विचारली तु अशी का? बघते..तुझे डोळे असे का दिसत आहे...तेव्हा मला माझी आई कुठल्याही विचार न करता डाँक्टरकडे घेऊन गेली ...लगेचच उपचार सुरू केली...माझे पपा खूप रागवायचे. पण, आई ही आईचं असते...तिची जागा कोणीच घेऊ शकत नाही... ती रात्रभर आपल्या पोटाशी धरून झोपली ...डोक्यावरून वारंवार प्रेमाने हात फिरवत होती ...आणि मी तेव्हा निवांत झोपली... आज माझे डोळे माझ्या आईच्या समयसुचकतेमुळे सुखरूप आहे...मी माझ्या आईची ऋणी आहे. माझी आई माझ्यासाठी किती धडपड करते हे मलाच माहिती आहे .अख्या जगाशी माझी आई माझ्यासाठी भांडू शकते. मी माझ्या आईचे उपकार कधीच फेडू शकत नाही. पण मला उपकाराची परतफेड करायची असेल तर मी तिचा आदर आणि सन्मान करूनच करेन. कारण ती होती आणि तिने मला जन्म दिले म्हणून मी आज इथपर्यंत पोहोचू शकले.....

कु सिद्धी ज्योत्स्ना भास्कर बनसोड
कुरखेडा, गडचिरोली
7378 47 0441

# कामोठेत “मा. श्री. परेशशेठ ठाकूर केसरी” भव्य कुस्ती स्पर्धा; दिग्गज मल्ल आमने-सामने

## लाल मातीत पुन्हा एकदा कुस्तीचा रोमांचक थरार !

महाराष्ट्र जीत



**पनवेल (साबीर शेख):-** महाराष्ट्राच्या मातीतून जन्मलेली आणि राज्याच्या परंपरेशी नाळ जुळवणारी कुस्ती केवळ खेळ नसून, शौर्य, परंपरा आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. याच परंपरेला पुन्हा उजाळा देत पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते व युवकांचे प्रेरणास्थान परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशनच्या वतीने“मा.श्री.परेशशेठ ठाकूर केसरी” भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, दिनांक १८ मे २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता कामोठे येथील सेक्टर ६ मधील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानात लाल मातीवर पार पडणार आहे. या स्पर्धेतील एकूण पारितोषिकांची रक्कम ११ लाख ११ हजार १११ रुपये इतकी असून, नामवंत मल्ल या स्पर्धेत आपल्या ताकदीची चुणूक दाखवणार आहेत. कुस्ती स्पर्धा फक्त एक खेळ नाही, तर देशाच्या मातीतल्या परंपरेचा, ताकदीचा आणि सन्मानाचा एक उत्सव असतो. लढतींत ताकद, धैर्य आणि कुशलता यांचा सुरेख संगम पाहायला मिळतो. त्यामुळे लाल मातीच्या या खेळाला अनन्य साधारण महत्व आहे. या स्पर्धेत रुस्तम ए हिंद पै. सिकंदर शेख विरुद्ध हिंद केसरी पै. सुखविंदर सिंह, ट्रिपल महाराष्ट्र केसरी पै. विजय चौधरी विरुद्ध पै. रिकार्डो अमेरिका (अमेरिका), डबल महाराष्ट्र केसरी पै. शिवराज राक्षे विरुद्ध हिंद केसरी पै. विक्रांत कुमार तसेच उपमहाराष्ट्र केसरी किरण भगत विरुद्ध हिंद केसरी पै. हितेंद्र कुमार या दिग्गज व नामवंत कुस्तीपटूंचे रोमहर्षक सामने होणार आहेत. त्या अनुषंगाने या स्पर्धेची जोरदार तयारी सुरु करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी मुद्रक आर्य्म प्रिंटर्स गांधी चौक कारंजा लाड येथे मुद्रीत करून दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी – ९९२१०४५१२१, ९६०४४३०००२ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत ) ( या आवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहील. )

१ २ ३ ४ ५ ६

दैनिक **महाराष्ट्र जीत**
रविवार दिनांक 11 मे 2025


# राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा नांदेड दौरा



**नांदेड जिल्हा प्रतिनिधी-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे रविवार 11 मे 2025 रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. रविवार 11 मे 2025 रोजी मुंबई येथून विमानाने सकाळी 9.10 वा. श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन व मोटारीने प्रयाण. सकाळी 9.45 वा. माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांच्या निवासस्थानी इंदिरा निवास काळेश्वर रोड विष्णुपूरी येथे आगमन व राखीव. मोटारीने सकाळी 11.15 वा. कै. मधुकरराव घाटे सहकारी सुतगिरणी मुखेड येथे आगमन व राखीव. मोटारीने दुपारी 12 वा. मुखेड तालुक्यातील चव्हाणवाडी (बाऱ्हाळी) येथे आगमन व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. दुपारी 1.30 ते 2.30 वाजेपर्यंत राखीव. दुपारी 3.15 वा. देगलूर येथे शहीद जवान कै. सचिन यादवराव वनंजे यांच्या घरी सात्वंनपर भेट. नंतर व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांच्या निवासस्थानी देगलूर येथे राखीव. सायं मोटारीने नांदेडकडे प्रयाण. सायं. 5.40 वा. श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन व सायं. 5.45 वा. विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

# ३ महिन्यांचे रेशन धान्य एकदम मिळणार, सरकारचे पुरवठा विभागाला आदेश

महाराष्ट्र जीत

**अहिल्यानगर-** भविष्यात येऊ शकणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना तयारी करण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने पुढील तीन महिन्यांचे धान्य उचलून ते लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. यासाठी जिल्हा पुरवठा विभागाने शुक्रवारी एक बैठक घेतली आणि सर्व तहसीलदारांना याची अंमलबजावणी तातडीने करण्यास सांगितले आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत जिल्ह्यातील अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेच्या लाभार्थ्यांना मोफत धान्य दिले जाते. अंत्योदय योजनेत सध्या ८७ हजार रेशनकार्डधारक असून, त्याद्वारे ३ लाख ८६ हजार लाभार्थी आहेत. तर, प्राधान्य कुटुंब योजनेत ६ लाख ३७ हजार रेशनकार्डधारक आणि २५ लाख ६३ हजार लाभार्थी आहेत. अंत्योदय योजनेतील प्रत्येक कुटुंबाला दरमहा ३५ किलो धान्य मिळते, ज्यात २० किलो तांदूळ आणि १५ किलो गहू असतात. प्राधान्य कुटुंब योजनेत प्रत्येक व्यक्तीला दरमहा ५ किलो धान्य मिळते, यात ३ किलो गहू आणि २ किलो तांदूळ असतात. आता या लाभार्थ्यांना पुढील तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी मिळणार आहे. पुरवठा विभागाने येत्या पावसाळ्याचा आणि संभाव्य पूर, प्रतिकूल हवामानामुळे धान्य वितरण आणि साठवणुकीत येणाऱ्या अडचणींचा विचार करून जूनचे नियमित धान्य आणि जुलै, ऑगस्ट या दोन महिन्यांचे धान्य आगाऊ उचलण्याचे नियोजन केले आहे. यासाठी ३० मेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. तालुकास्तरावरील शासकीय गोदामांमध्ये पुरेशा प्रमाणात धान्य साठवण्यासाठी जागेची गरज आहे. जागा कमी पडल्यास पर्यायी व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, वाहतूक ठेकेदारांना २० दिवसांत तीन महिन्यांचे धान्य वाहतूक करण्यासाठी पुरेशी वाहने उपलब्ध करून देण्यास सांगितले आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या कडक सूचनांमुळे यात कोणतीही

**दररोज रेशन धान्य दुकाने सुरू ठेवण्याच्या सूचना**

**गोदामांमध्ये धान्य पोहोचल्यानंतर रेशन दुकानदारांनी तातडीने ते लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवायचे आहे. रेशन दुकानदारांना दररोज दुकाने उघडी ठेवून लाभार्थ्यांना वेळेत तीन महिन्यांचे धान्य वाटप करण्याचे आदेश आहेत. यानुसार, लाभार्थ्यांना जून, जुलै आणि ऑगस्ट या तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी मिळेल. पुरवठा विभागाने याची अंमलबजावणी तात्काळ करण्याचे निर्देश सर्व संबंधितांना दिले आहेत.**




# डॉ दीपक हरके यांचा रशियामध्ये होणार ग्लोबल लिडर अवॉर्ड ने सन्मान



रशिया मध्ये दुसऱ्या महायुद्धात नाझी जर्मनीवर रशियाने मिळविलेल्या विजयाचे स्मरण म्हणून दरवर्षी नऊ मे रोजी विजयदिन समारंभ साजरा केला जातो. यावेळी मॉस्को मधील लाल चौकात लष्करी कवायती होतात. यानिमित्ताने सेंट पिट्सबर्ग मध्ये ११ मे रोजी आयोजित केलेल्या समिट मध्ये जगभरात १४३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्राच्या माध्यमातून निशुल्क ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे ध्यानधारणा प्रशिक्षक ब्रह्माकुमार डॉ दीपक हरके यांचा जगभरात भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रचार व प्रसार केल्याबद्दल ग्लोबल लिडर अवॉर्ड ने सन्मान होणार आहे. ब्रह्माकुमार डॉ दीपक हरके हे १८३ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय आहेत. तसेच त्यांनी विविध विश्वविक्रम हे भारताच्या प्राचीन राजयोगाचा प्रसार करण्यासाठी केले आहेत.यापूर्वी ही ब्रह्माकुमार डॉ दीपक हरके यांना देशात व परदेशात विविध पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. त्यांना लंडन मध्ये विविध ८ पुरस्कार मिळाले आहेत, यामध्ये ब्रिटिश पार्लियामेंट व ऑक्सफर्ड विद्यालयात त्यांना विशेष सन्मानित करण्यात आलेले आहे.लंडन बरोबरच त्यांना दुबई मध्ये विविध ५ पुरस्कारांनी, बँकॉक येथे ३ पुरस्कारांनी, नेपाळ येथे २ पुरस्कारांनी तसेच स्वित्झर्लंड, मलेशिया व श्रीलंकेमध्ये ही विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे त्यांच्या कार्याची दखल मार्च २०२० मध्ये विश्वविख्यात फोर्ब्स मासिकाने घेतली आहे. बी के डॉ दीपक हरके हे महाविद्यालयात शिक्षण घेत असताना या संस्थेच्या संपर्कात आले व नंतर त्यांनी स्वतःचे संपूर्ण जीवन या कार्यासाठी समर्पित केले.आता ते पूर्णवेळ ध्यानधारणेचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य जगभरात करत आहेत.

# बुद्ध जयंती निमित्त मोटार सायकल रॅलीचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**कारंजा लाड :** एकता मित्र मंडळ,राहुल नगर दारव्हा वेश,कारंजा लाड यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दिनांक : 12 मे 2025 रोजी भगवान गौतम बुद्ध जयंती निमित्त शहरातील प्रमुख मार्गावरून मोटार सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. 12 मे 2025 रोजी सकाळी 8.30 वाजता मोटार सायकल रॅलीचा प्रारंभ राहुल नगर दारव्हा वेश येथून करण्यात येईल. शहरातील मंगलवारा, नगर परिषद कार्यालय, रामा सावजी चौक, दत्त मंदिर, सोनटक्के यांचे घर, सुभाष चंद्र बोस पुतळा चौक, झाशी राणी चौक बायपास, टी पॉईंट, बस स्थानक रोड ते अशोक नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जयस्थभ चौक ते नेहरू चौक ते गाडगेबाबा पुतळा ते महात्मा फुले चौक ते वीर संभाजी चौक ते दारव्हा वेश या मार्गाने रॅली काढण्यात येणार आहे व दारव्हा वेश राहुल नगर येथेच रॅलीचा समारोप करण्यात येईल.

आयोजित मोटरसायकल रॅलीत शहरातील राहुल नगर, पंचशील नगर, सिद्धार्थ नगर, माळीपुरा, भीम नगर, महात्मा फुले नगर, गौतम नगर, अशोक नगर, प्रबुद्ध नगर, शिक्षक कॉलनी आधी सह कारंजा लाड शहरातील बौद्ध बांधवांनी बहुसंख्येने रॅलीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन एकता मित्र मंडळ, राहुल नगर दारव्हा वेश यांच्या वतीने करण्यात येत आहे

# बुद्धिबळ स्पर्धेमुळे जास्तीत जास्त ग्रँडमास्टर तयार होतील

महाराष्ट्र जीत

**अहिल्यानगर :** अखिल भारतीय मोतीलालजी फिरोदिया खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन अ.नगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व आंध्र प्रदेश चा इंटरनॅशनल मास्टर कृष्णा तेजा ह्यांचा हस्ते पटावर चाल देऊन करण्यात आले व स्पर्धेच्या उद्घाटनाच्या वेळी आपल्या उद्घाटनपर भाषणात अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी बुद्धिबळा साठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटना कटिबद्ध राहील आम्ही लवकरच राष्ट्रीय पंच परीक्षा, बीलो १६०० बुद्धिबळ स्पर्धा असे नवनवीन उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला व अहिल्यानगर जिल्ह्यात बुद्धिबळ स्पर्धेमुळे जास्तीत जास्त ग्रँडमास्टर तयार होणार असल्याची देखील त्यांनी भावना व्यक्त केली. यावेळी आंध्र प्रदेश चा इंटरनॅशनल मास्टर कृष्णा तेजा यांनी बुद्धिबळ स्पर्धेच्या नियोजना साठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे आभार व्यक्त केले व दर्जेदार स्पर्धा भरवल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. या वेळी सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त श्याम कांबळे, पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, नवनीत कोठारी, दत्ता घाडगे, चेतन कड, किरण सरोदे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, डॉ स्मिता वाघ, रोहिणी आडकर. आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण ठाकरे, पवन राणे, शार्दुल तापसे, देवेंद्र ढोकळे, प्रशांत गंगेकर, विष्णू कुड्रे, स्वप्नील भुंगुरकर, सुनील जोशी, मनीष जसवानी आदीसह खेळाडू पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्पर्धेचे प्रस्ताविक सचिव यशवंत बापट म्हणाले की, या स्पर्धेत भारतातून बुद्धिबळ खेळाडू खेळण्यासाठी आले आहे. यामध्ये गुजरात, आंध्र प्रदेश, दिव, दमन, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र इत्यादी राज्यातून ३०० च्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला.

# सर्व शाळांमध्ये डॉ. कल्पना घडेकर यांचे अबॅकस संशोधन शिकवावे : अंजना पवार

## सौ.घडेकर यांना अबॅकस मधील संशोधनाबद्दल पीएचडी पदवी प्रदान

महाराष्ट्र जीत



**अहिल्यानगर** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० देशांमध्ये लागू झाले असून यांमधून मोठी शैक्षणिक क्रांती घडणार आहे.यासाठी शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल होत आहेत.नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण शैक्षणिक संकल्पनांना आता महत्त्व येणार आहे. अशा परिस्थितीत पारंपारिक शिक्षणाबरोबरच आधुनिक शिक्षणाच्या अबॅकस सारख्या संकल्पना आता महत्त्वाच्या ठरणार आहेत. भारतातील सर्व शाळांमध्ये डॉ.कल्पना घडेकर यांचे अबॅकस संशोधन शिकवले जावे, असे प्रतिपादन भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाच्या उपाध्यक्षा अंजना पवार यांनी केले.

येथील रक्षिता महिला मंचच्या संस्थापिका कल्पना अशोक घडेकर- कार्ले यांना भारत सरकारच्या नीती आयोग, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय तसेच सूक्ष्म व लघु उद्योग मंत्रालय, तसेच आयर्लंड अॅक्रेडेशन फोरमच्या वतीने प्रमाणित लिजेंड्री पीस अवॉर्ड कौन्सिल या शैक्षणिक विद्यापीठाची अबॅकस या गणितीय संकल्पनेतील मोजणीमधील हातच्याची अडचण सोडवणाऱ्या क्रांतीकारी संशोधनाबद्दल केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील पहिली पीएचडी प्रदान करताना अंजना पवार बोलत होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बिहारचे खासदार सुरज मंडल, संगीतकार ब्रह्मपाल नागर, अभिनेत्री पायल सरकार व इतर मान्यवर उपस्थित होते.

शिष्यवृत्ती, राष्ट्रीय ओळखपत्र, पीएचडी सनद, गौरवचिन्ह, पीएचडी पदक, सॅश-सन्मान वस्त्र आदी या पदविकेचे स्वरूप असून नवी दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे संपन्न झालेल्या या शानदार समारंभात संपन्न झालेल्या या सोहळ्यासाठी देश-विदेशातील शिक्षण तज्ञ उपस्थित होते. यावेळी डॉ. घडेकर यांनी पीएचडीच्या मुख्य विषयाचे अबॅकस मण्यांची पाटी, अबॅकस वरील स्वलिखित/ प्रकाशित वैशिष्ट्यपूर्ण ५० पुस्तकांचे प्रदर्शन,वैदिक गणिताची संकल्पना पीपीटी प्रेझेंटेशनसह सादरीकरण केले. सादरीकरणानंतर उपस्थित मान्यवर व विषय तज्ञ यांनी विचारलेल्या शंका व प्रश्नांचे निरसन केले.

# विद्यार्थ्यांना प्रगतीपुस्तकाबरोबर शिक्षकाने वाटले गल्ले

## समर्थ प्रशालेत माझा गल्ला-माझी बचत उपक्रम

महाराष्ट्र जीत

**अहिल्यानगर :** विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच आर्थिक बचतीची सवय लागून बँकिंग, गुंतवणूक आणि इतर वित्तीय बाबींची माहिती होऊन विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरता समजावी म्हणून येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचे दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक तथा जगातील सर्वाधिक पारितोषिके विजेते कलाकार डॉ.अमोल बागुल यांनी स्वखर्चातून शालेय निकालाच्या दिवशी प्रगती पुस्तकाबरोबर १०२ विद्यार्थ्यांना पैसे साठवण्यासाठी गल्ले वितरीत केले.

''माझा गल्ला-माझी बचत'' या उपक्रमात१ मे-महाराष्ट्र दिन २०२५ ते १ मे २०२६ या कालावधीत विद्यार्थ्यांनी या गल्ल्यामध्ये पैसे साचवायचे असून ''आई.. मी पैसे वाचवणार, पप्पा.. मी पैसे साचवणार'' असे या उपक्रमाचे घोषवाक्य आहे. येत्या वर्षभरातील स्काऊट -गाईड- समाजसेवा यासारखे उपक्रमांतील स्व कमाई /खरी कमाई उपक्रमातील पैसे,वाढदिवशी मिळालेले पैसे,पाहुण्यांनी दिलेले खाऊचे पैसे,बक्षीसातून मिळालेले पैसे,एखाद्या शिष्यवृत्तीतून मिळालेले पैसे,घरातील रद्दी/भंगार विकून मिळालेले पैसे, प्रामाणिकपणे मिळालेले पैसे,महागड्या वस्तू टाळून बचत झालेले पैसे इत्यादी प्रकारची रक्कम या गल्ल्यामध्ये साठवायची आहे.

पालक व विद्यार्थी यांना संबोधित करताना डॉ.बागूल म्हणाले की ''विद्यार्थ्यांनी जुन्या रद्दी कागदापासून ''माझी बचत वही'' तयार करून त्यात स्वतःच्या जमाखर्चाचा साप्ताहिक तपशील लिहावा.शक्य असल्यास मोफत ऑनलाईन खर्च ट्रॅकर अॅपचा वापर करावा, माझी बचत हीच माझे भविष्य ओळखून वायफळ खर्च टाळावा,पालकांचे उत्पन्न व आपला खर्च यानुसार स्वतःचे बजेट तयार करावे.इच्छा व गरज याचा विचार करूनच स्वतःचा पॉकेटमनी खर्च करावा.कमीत कमी स्वतःच्या जन्मवर्षाइतके पैसे साचवावेत. एक वर्षानंतर महाराष्ट्रदिनीच या उपक्रमातील बचतीचा आढावा घेतला जाणार आहे.'' पालकांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

डॉ.बागूल यांना या उपक्रमासाठी श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी,तसेच अॅड किशोर देशपांडे (शालेय समिती चेअरमन),प्राचार्या संगीता जोशी,पर्यवेक्षक सुनील कानडे आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.



# दिल्लीगेट ते चितळे रस्ता रहदारीचा प्रश्न मार्गी; आयुक्त यशवंत डांगे यांचा पुढाकार

महाराष्ट्र जीत

**अहिल्यानगर:** शहराच्या मध्यवर्ती भागात दिवसेंदिवस रहदारी वाढत आहे. अशात दिल्लीगेट वेस ते चौपाटी कारंजा व चितळे रस्त्यावरील अतिक्रमणांमुळे दररोज वाहतूक कोंडी होत होती. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी पुढाकार घेऊन तेथील अतिक्रमणधारक पथविक्रेते, हातगाडी विक्रेत्यांना मानकर गल्ली पटांगणात बसण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे दिल्लीगेट ते चितळे रस्ता या भागातील रहदारीचा प्रश्न काही प्रमाणात मार्गी लागला आहे. दिल्ली गेट वेस, चौपाटी कारंजा व चितळे रस्ता हा कायम रहदारीचा रस्ता असून, अतिक्रमणांमुळे या ठिकाणी नेहमी वाहतूक कोंडी होत होती. अनेक वर्षांपासून हा प्रश्न कायम होता. अतिक्रमणांवर कायमस्वरूपी तोडगा निघत नसल्याने नागरिकांना, वाहनचालकांना सातत्याने त्रासाला सामोरे जावे लागत होते. आयुक्त डांगे यांनी या प्रकरणात लक्ष घालून तेथील अतिक्रमणधारक विक्रेत्यांना जवळच असलेल्या मानकर गल्ली पटांगणात बसण्यासाठी जागा उपलब्ध करून दिली. सकाळी व सायंकाळी अशा दोन सत्रांत तात्पुरत्या स्वरूपात ही जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सोमवारपासून या विक्रेत्यांचे या जागेत स्थलांतर करण्यात आल्याने रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीची समस्या काही अंशी मार्गी लागणार आहे. नेहरू मार्केटचा जागेवर व्यापारी संकुल महानगरपालिका नेहरू मार्केटच्या जागेत भाजी मंडईसह व्यापारी संकुल उभारत आहे. त्यासाठी टेंडर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. या माध्यमातून चितळे रस्त्यावर बसणाऱ्या भाजीविक्रेत्यांना बसण्यासाठी जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे येत्या काळात चितळे रस्त्यावरील अतिक्रमणांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार असल्याचे आयुक्त डांगे यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, ज्यांना जागा उपलब्ध करून दिली आहे, त्यांनी रस्त्यावर व्यवसाय केल्यास, महानगरपालिका कठोर कारवाई करणार, असा इशाराही आयुक्त डांगे यांनी दिला आहे.

# मलाबार गोल्ड अॅड डायमंड २.५० लाखांचे चैन चोरी प्रकरणी पोलिसानी अवघ्या ६ तासातच गुन्हा उघड एकुण ३ लाख १८ हजार ६२२-रुपये चे मुद्देमाल जप्त

महाराष्ट्र जीत

**अकोला जिल्हा**
**प्रतिनिधि दानिश चौधरी**

**अकोला -:** दिनांक ०८. मे रोजी १२.४५ दरम्यान अकोला शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या प्रतिष्ठीत "मलाबार गोल्ड अॅड डायमंड" या सोन्याच्या दागीन्याच्या दुकानात चतुराईने ग्राहक बनुन आलेल्या एका अनोळखी महीलने चेह-यावर स्कार्फ बांधुन स्वतः ची ओळख लपवुन मलाबार गोल्ड अँड डायमंड येथील सेल्समन फिर्यादी नामे प्रविण बालाजी वडजे वय ३२ वर्षे रा राउतवाडी मधुप्रभा अपार्टमेंट, अकोला यांना सोन्याची चैन घेण्याचा बहाणा करून फिर्यादी यांनी तिच्या समोर सोन्याच्या चैनचा ट्रे ठेवला असता सदरील महीलेने ट्रे ची पाहणी करतांना फिर्यादी यांची नजरचुकवुन सदरील सोन्याच्या चैनच्या ट्रे मधुन ०४ ग्रॅम ची चैन किं, ४२ हजार २० ग्रॅमची चैन किं.२ लाख ०६ हजार ६२२ रूपयांचा मुददेमाल चोरून नेला त्या बाबत फिर्यादी यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या




फिर्यादीवरून १६५/२०२५ कलम ३०५ भा. न्या. सं. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच एकता ज्वलेर्स येथे सदरील महीलेने अशाच प्रकारे चोरी करण्याचा प्रयत्न केला. तसेच सदरील आरोपी महीला एकता ज्वेलर्स येथे चोरी करण्याच्या उददेशाने चेह-याला स्कार्फ बांधुन गेली असता तेथे हजर असलेल्या जागरूक स्टाफने तिला चेहऱ्यावरील स्कार्फ काढणे बाबत विनंती केल्याने सदरील महीलेने चेह-यावरील स्कार्फ काढल्याने तिचा एकता ज्वलेर्स येथे चोरीचा प्रत्यन फसला. घटनेचे गांभीर्य पाहुन पोलीस अधिक्षक, अकोला यांचे आदेशावरून स्थानीक गुन्हे शाखा अकोला चे पोलीस निरीक्षक शंकर शेळके व पोलीस स्टेशन सिव्हील लाईन चे पोलीस निरीक्षक जयंत सातव यांनी घटनास्थळाला भेट दिली असता स्थानीक गुन्हे शाखा अकोला चे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांनी पो. नि. जयंत सातव यांचेशी चर्चा करून स्थागुशा येथील पथकाला पुढील सुचना व मार्गदर्शन केले त्यावरून सदर गुन्हयात स्थागुशा येथील तपास पथकाने समांतर तपास करून तांत्रीक विश्लेषण व गुप्त बातमीदार लावण्यात आले. असता सदर गुन्हा हा कैलास टेकडी येथे राहणारी महीला नामे ईशा सत्यप्रकाश पांडे वय २२ वर्षे रा. शिव मंदीरा जवळ, कैलास टेकडी, अकोला हीने केला असल्याचे निष्पन्न झालेवरून नमुद महीला आरोपी हीचे कडुन तिने "मलबार गोल्ड अॅड डायमंड" येथुन चोरी केलेले सोन्याचे दागिने ०४ ग्रॅम ची चैन किंमत. ४२ हजार व २० ग्रॅमची चैन किंमत. २ लाख ६ साहा हजार ६२२ रूपयांचा मुददेमाल तसेच गुन्हयात वापरलेले वाहन टिव्हीएस ज्युपीटर किंमत ७० हजार असा एकुण ३ लाख १८ हजार ६२२ रुपये चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील कायदेशीर कार्यवाही साठी पो. नि. सिव्हील लाईन आणि वरीष्ठांना माहीती देवुन तपास अधिकारी पोउपनि, धर्माळे, पो. स्टे. सिव्हील लाईन, अकोला यांना कळविण्यात आले. सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक अकोला बच्चन सिंह, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे उपविभागीय पोलीस विभाग अधिकारी शहर सतिष कुळकर्णी, पो. नि. जयंत सातव, पो.स्टे. सिव्हील लाईन, पो.निल शंकर शेळके स्थागुशा अकोला यांचे मार्गदर्शनात पोउपनि माजीद पठाण स्थागुशा. पो. अमंलदार एएसआय गणेश पांडे, पोहेकों रवि खंडारे, महेंद्र मलिये, वसीमोद्दीन शेख, मोहम्मद एजाज, अब्दुल माजीद, फिरोज खान, भास्कर धोत्रे, पोकों अशोक सोनोने, अमोल दिपके, सतिष पवार, राहुल गायकवाड, मपोहेकों तुळसा दुबे चालक पो. हया प्रशांत कमलाकर यांनी केली आहे. पोलीस अधिक्षक अकोला व स्थानीक गुन्हे शाखा, अकोला यांचे कडुन सर्व सराफा व्यवसायीकांना आव्हान पोलीस अधिक्षक अकोला व स्थानीक गुन्हे शाखा, अकोला यांचे कडुन सर्व सराफा व्यवसायीकांना आव्हान करण्यात येते की, आपले सराफा दुकानात स्कार्फ, मास्क व हेल्मेट अशा प्रकारे चेहरा झाकुन येणा-या ग्राहकांशी कोणत्याही प्रकारचे खरेदी व विक्रीचा व्यवहार करून नये किंवा सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना दुकानात प्रवेश देवु नये. तसेच दुकानात येणा-या ग्राहकांच्या वाहनांचे वाहन कमांकाची नोंद ठेवणे बाबत सुरक्षारक्षकाला सुचना देण्यात याव्या असे आव्हान करण्यात येत आहे.

# रायझिंग स्टार स्कूलच्या उपक्रमशील प्रिन्सिपल ममता मसूरकर यांना डॉ.अब्दुल कलाम मोटिवेशन अवार्ड ने सन्मान...!




महाराष्ट्र जीत

**ठाणे(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)**

**ठाणे-** कळवा येथील रायझिंग स्टार प्री प्रायमरी स्कूलच्या अत्यंत उपक्रमशील प्रिन्सिपल ममता मसुरकर यांना त्यांच्या सातत्याने सामाजिक ,शैक्षणिक क्षेत्रातील अभिनव कामगिरीबद्दल डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम मोटिवेशनल अवॉर्ड पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नुकताच हा पुरस्कार वितरण सोहळा कोल्हापूर येथे पार पडला.कार्यक्रमात विशेष उल्लेखनीय कामगिरीबद्दल ममता मसूरकर यांना ' 'आयडियल प्रोफेसर' 'या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले त्यांच्या विविध योगदानाबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी उपक्रमशील प्रिन्सिपल व सामाजिक कार्यकर्ता तसेच सातत्याने विविध सामाजिक विषयांवर आवाज उठवत आपल्या अभिनव कामगिरीचे जनसेवेचे व्रत घेतलेल्या ममता मसूरकर यांना राज्य राखीव पोलीस दलाचे सहाय्यक समादेशक श्री सदानंद सदाशिव, दैनिक रोखठोकचे कार्यकारी संपादक डॉ.सुरेश राठोड, लेखक, निर्माता ,दिग्दर्शक श्री अशोक सूर्यवंशी, आर एस पी अधिकारी अभिजीत तासगावकर या मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह, सन्मानपत्र ,शाल व श्रीफळ अशा भव्य स्वरूपात पुरस्कारविण्यात आले. गार्गीज डीआयडी फाउंडेशन आणि बिग मॅडी वेल्फेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने भव्य अशा पुरस्कार वितरणाचे कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच रेडियंट हॉटेल कोल्हापूर येथे करण्यात आले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला. ममता मसूरकर या स्तुत्य कामगिरीबद्दल विविध स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तरुणाची देशविरोधी चिथावणीखोर पोस्ट, रायगड मध्ये गुन्हा दाखल

महाराष्ट्र जीत

अविनाश जाधव वार्ताहर
कळंबोली वार्ताहरः- काश्मीरमधील (Jammu Kashmir) पहलगाममध्ये (Pahelgam Terror Attack) 22 एप्रिल रोजी भारतीय पर्यटकांवर दहशतवाद्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात 26 भारतीय नागरीकांनी जीव गमावलाय. दरम्यान, भारतीय पर्यटक मृत्यूमुखी पडल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त होत असताना भारत सरकारने मोठा निर्णय घेतला. भारतीय लष्कराने पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी ऑपरेशन सिंदूरला (Operation Sindoor) सुरुवात केली आणि त्यानंतर भारत पाकिस्तानमध्ये युद्धाला सुरुवात झालीये. दोनसमाजाततेढनिर्माणकरण्याचाप्रयत्नकेल्याप्रकरणीतरुणावरगुन्हादाखल भारत पाकिस्तानमध्ये युद्ध सुरु असताना रायगडमधील (Raigad crime news) एका तरुणाने देशविरोधी पोस्ट केली आहे. भारत आणि पाकिस्तान मध्ये युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असून रायगडच्या (Raigad crime news) पेणमधील एका तरुणाने देशाविरुद्ध चिथावणी करण्याचा प्रयत्न केलाय. या घटनेनंतर त्याच्याविरोधात पेण शहरातील सर्वधर्मीय नागरिकांनी त्याच्याविरोधात निषेध व्यक्त केला आहे. या प्रकरणाची पेण पोलिसांनी दखल घेतली असून त्याच्यावर भा. न्या. स. कलम 353,1 ख व 353 ( 2) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलाय पोलिसांनी पुढील तपास सुरु केलाय.

सर्वधर्मीयांकडून देशविरोधी पोस्ट करणाऱ्या तरुणाचा निषेध तरुणाने आपल्या इन्स्टाग्रामवरील अकाऊंटवरून देशाविरुद्ध चिथावणीखोर विधान करून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केलाय. त्यामुळे पेण मधील सर्वपक्षीय कार्यकर्ते व नागरिकांनी याचा जोरदार निषेध केला आहे. पेण नगरपालिका व छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासमोर पाकिस्तानचे बॅनर पायाखाली तुडवून नीम का पत्ता कडवा है पाकिस्तान भडवा है, भारत माता की जय, वंदे मातरम, जय श्रीराम अशा घोषणा देत ही निषेध रॅली काढण्यात (Raigad crime news) आली. यावेळी असंख्य नागरिक या निषेध रॅलीत सहभागी झालेले पाहायला मिळत आहेत. दरम्यान, रायगडपूर्वी (Raigad crime news) पुण्यातील एका तरुणाने देखील देशविरोधी पोस्ट केली होती. पुण्यात वास्तवात असलेल्या तरुणीने पाकिस्तानच्य समर्थनार्थ पोस्ट केली होती. त्यानंतर पुणे पोलिसांनी या तरुणीला अटक केली असून तिच्या कॉलेजनेही तिच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

# इंस्टाग्रामवरून पाकिस्तानचे समर्थन करणाऱ्याला अटक

महाराष्ट्र जीत

**भिवंडी, (सुनील झळके)** पहलगाम अतिरेकी ल्ल्याचे प्रत्युत्तर भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पाकिस्तानला दिलेला असतानाच, शहरातील एका युवकाने आपल्या मोबाईलच्या ईस्टग्राम स्टोरीवर पाकिस्तानचे समर्थन केल्याबद्दल त्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे, अशी माहिती भिवंडी शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक कृष्णदेव खराडे यांनी दिली आहे. अफसर अली अजगर अली शेख वय १८, असे अटक आरोपीचे नाव आहे. बुधवारी भारतीय सैन्याने पाकिस्तानी अतिरेक्यांवर कारवाई केली. त्याचे संपूर्ण देशवासीयांकडून स्वागत करीत बदला घेतल्याबद्दल आनंदोत्सव साजरा केला जात असताना शहरातील या तरुणाने आपल्या मोबाईलवर इंस्टाग्राम स्टेटसवर *चाहें जो हो जाये सपोर्ट तो बस पाकिस्तान को करेंगे*असा देशविरोधी संदेश ठेवला होता. त्यामुळे त्याच्यावर तात्काळ अटकेची कारवाई पोलिसांच्यावतीने करण्यात आली.



# मंगरूळपीर येथे माननीय बाळासाहेब आबेडकर यांचा वाढदिवस साजरा.

महाराष्ट्र जीत तालुका प्रतिनिधी.
अजय भगत.

महाराष्ट्र जीत

**मंगरुळपीर. :** येथे श्रध्येय बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस साजरा करण्यांत आला .याप्रसंगी मंगरूळपीर शहरातील स्थानीक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूतळयाला पूष्पहार अर्पण करून अभिवादन करून श्रध्देय बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसा निमित वंचीत बहुजन आघाडी मंगरूळपीर तालुक्याच्या वतीने ग्रामीण रुग्णालय येथे फळे व बिस्कीटे वाटप करण्यांत आले. यावेळी समाधान भगत जिल्हा उपाध्यक्ष,शंकरदादा तायडे माजी तालुका अध्यक्ष,सुनिल वानखडे माजी तालुकाध्यक्ष, नरेंद्र राऊत माजी सचीव,साहेबराव कांबळे पारवा सर्कल माजी अध्यक्ष गोपाल मनवर,विश्वास ताटके,अनिल खडसे आदी वंचीत चे कार्यकर्ते उपस्थित होते .




# विद्युत पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्या : जिल्हाधिकारी

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला महावितरणच्या कामांचा आढावा

## मान्सूनपुर्व कामे तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत दिलीप मादाळे**
सध्या नांदेड जिल्ह्याचा पारा 43 अंशाच्या जवळपास असून हवेत प्रचंड उकाडा वाढला आहे. त्यामुळे ग्राहकांची विजेची मागणी वाढली असून पुरवठा कमी पडत आहे. त्यामुळे वारंवार विज पुरवठा बंद पडण्याच्या घटना वाढल्या आहेत. याबाबत महावितरण विभागाने आवश्यक त्या उपाययोजना करुन विद्युत पुरवठा सुरळीत राहील यांची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. काल शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयात महावितरण विभागाच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, अधिक्षक अभियंता सुधाकर जाधव, कार्यकारी अभियंता विनय बहादूर, रुमदेव चव्हाण, मंगेश बोरगावकर तसेच महावितरण विभागाच्या अधिकारी



कर्मचारी आदीची उपस्थिती होती. यावेळी मान्सूमपुर्व कामे प्राधान्याने करा, विजेच्या समस्याबाबत ग्राहकांशी, नागरिकांशी सुसंवाद ठेवा. उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 तसेच इतर योजनेअंतर्गत उपकेंद्र रोहित्र वाढविण्याचे कामे प्राधान्याने पूर्ण करा. यंत्रणा अलर्ट मोडवर ठेवा, ग्राहकांचे मोबाईल क्रमांक अपडेट करुन घ्या. उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे कामे 10 दिवसांत पूर्ण होतील यांची काळजी घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच दुरुस्तीचे कामे करताना महावितरणने ग्राहकांची गैरसोय होणार नाही यासाठी मॅसेज पाठवून पुर्वसूचना द्यावी. यामुळे ग्राहकांच्या तक्रारी वाढणार नाहीत. तसेच दुरुस्तीच्या कामासाठी अद्ययावत यंत्राचा वापर वाढवावा. यासाठी आवश्यक त्या साहित्यांची खरेदी करावी अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. नांदेड जिल्ह्यात 1 हजार 725 गावे व 720 वाडीपाडे असून या गावामध्ये महावितरणद्वारे विद्युतीकरण झालेले आहे. तसेच जिल्ह्यात एकूण 6 लाख 29 हजार 147 विज ग्राहक आहेत. या सर्व ग्राहकांना उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विज पुरवठा करताना विजेच्या मागणीनुसार पुरवठा कमी पडत आहे. त्यानुसार महावितरण विभागाकडून उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे ही समस्या लवकरच सुटण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती महावितरणचे अधिक्षक अभियंता सुधाकर जाधव यांनी दिली. तसेच यावेळी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0, नवीन उपकेंद्रे मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजना प्रणाली सुधारणा, नवीन अतिरिक्त उपकेंद्र रोहित्र मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 प्रणाली सुधारणा , एबीडी योजनेअंतर्गतच्या प्रस्तावित कामांची माहिती, नवीन उपकेंद्रे, सुधारित वितरण क्षेत्र योजना, वाहिनी विलगीकरण उपाययोजना, सोलार प्रकल्प यातील प्रगतीपथावर असलेल्या कामांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

# यावर्डी येथील दहावीच्या २९ व नववीच्या २१ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाच्या संचांचे वितरण

## (आदिशक्ति महिला बहूऊद्देशिय संस्थेचा उपक्रम,२०१६ पासून हा उपक्रम अखंड सुरू आहे)

महाराष्ट्र जीत

**कारंजा तालुका प्रतिनिधी-** येथून जवळच असलेल्या ग्राम यावर्डी येथील बाबासाहेब धाबेकर विद्यालयात ०६ मे रोजी आदिशक्ती महिला बहुद्देशीय संस्था वाल्हई तर्फे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुस्तक पेढी योजनेअंतर्गत दहावीच्या २९ तर नववी च्या २१ होतकरू विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाच्या संचांचे वितरण करण्यात आले. बाबासाहेब धाबेकर विद्यालय यावर्डीचे मुख्याध्यापक विजय भड यांच्या हस्ते विद्यार्थीना पाठ्यपुस्तक संचाचे वाटप करण्यात आले. गोपाल काकड यांनी आपल्या प्रास्तविकात क्रांतीज्योती पुस्तकपेढी योजनेचे उद्देश सांगून शासनाचा कोणताही निधी न घेता ही संस्था सामाजिक बांधिलकी म्हणून होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा येऊ नये म्हणून २०१६ पासून हे कार्य अखंड पणे करीत आहे. यानंतर उपस्थित दहावीच्या२९ व नववीच्या २१ विद्यार्थ्यांना पाठय़पुस्तकाच्या संचाचे वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक विजय भड म्हणाले




की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुस्तक पेढी योजनेअंतर्गत आमच्या विद्यालयातील ५० विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना संच उपलब्ध करून दिलेत त्याबद्दल आदिशक्ती महिला बहुद्देशीय संस्थेच्या सर्व संचालक मंडळाच्या उपक्रमाचे कौतुक करून, आभार मानले व विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घेऊन जीवनात यशस्वी व्हावे असे आव्हान केले. कार्यक्रमाचे संचालन शाळेचे शिक्षक अनिल हजारे तर आभार राजेश शेंडकर यांनी मानले. यावेळी बहुसंख्य गांवकरी पालक व विद्यार्थी आणि शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्म.उपस्थित होते.

# भिवंडी परिसरातील डोंगराळ भागातील गौण खनिजाचे व मातीचे बेकायदेशीरपणे उत्खनन - शासनाच्या वनविभागाचे करोडो रुपयांचे नुकसान.

महाराष्ट्र जीत

**भिवंडी दि.(सुनील झळके)** भिवंडी तालुक्यातील पडघा वनपरिक्षेत्र व भिवंडी वनपरिक्षेत्र परिसरातील वन खात्याच्या डोंगरावरील गौण खनिजाचे व मातीचे उत्खनन व झाडांची मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीरपणे कत्तल सुरू असून भूमाफिया,बिल्डर लॉबी व राजकीय हितसंबंधित यांना कोकण विभागीय वन संरक्षक व संबंधित वनपरिक्षेत्र यांचे आशीर्वाद असल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. भिवंडी तालुक्यातील वन खात्याच्या डोंगरावर मागील अनेक महिन्यांपासून मातीचे, गौण खनिजाचे भूमाफियांकडून व बिल्डरांकडून मोठ्या प्रमाणावर उत्खनन सुरू आहे. त्यामुळे वनखात्याचे दररोज करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे. या उत्खननाने या परिसरातील डोंगर भाग नष्ट होत चालला असून,त्यामुळे आजूबाजूच्या पर्यावरणास व वन्य प्राण्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे पडघा वनपरिक्षेत्रपाल व भिवंडी वनपरिक्षेत्र पाल यांच्या डोळ्या देखत हे गौण खनिज उत्खननाचे काम चालू असताना सुद्धा सदर अधिकारी संबंधित भूमाफिया विरुद्ध कोणतीही कारवाई करीत नाही. सदर वन अधिकाऱ्यांना या भूमाफिया कडून मोठ्या प्रमाणावर हप्ता दिला जात असल्याचे तक्रारी व भूमापियानविरुद्ध कोणतीही कारवाई न करण्याच्या वन अधिकाऱ्यांच्या बोटचेपे धोरणामुळे या परिसरातील नागरिक संताप व नाराजी व्यक्त करताना दिसतात.







# अवीट चवीचा गावरान आंबा काळाच्या ओघातहद्दपार !

## इतर क्षेत्रातून येणाऱ्या आंब्याचे वाढलेले महत्त्व आणि झालेले ब्रॅण्डिंग मुळे गावरान आंब्याचे महत्त्व आपसूकच घटले

महाराष्ट्र जीत

**महादेव हरणे**
**वाशिम :-** फळाचा राजा म्हणून गावरान आंब्याची क्रेझच वेगळीच.. गावरान आंबाचा काळ आता ओसरलेला दिसतो. पूर्वीच मोजमाप आणी आताच मोजमाप यातही भारी तफावत दिसुन येते. गावाकडच्या शेतशिवारातील पाडावर फुलणारा गावरानआंबा, आता केवळ इतिहास ठरला आहे. गावातून शेतांकडे जाणाऱ्या पांदण रस्त्यावर उन्हाळ्यात गार सावली देणारे, हे गावरान आंब्याचे वृक्ष आता केवळ स्वप्न ठरले आहे. आर्थिक निकष आणि कृषी उत्पन्न यातील गणितात गावरान आंब्याचे वृक्ष बसत नसल्याने, ही स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळेच, गावरान नावाचा लुसलुसितआंबाजिल्ह्यातून हद्दपार झाला, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. जिल्ह्यात आंब्याच्या बागाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे किंबहुना आता म्हणावे लागेल आंबरायाच राहील्या नाहीत. वाशिम जिल्ह्यात आंबा, हे मुद्दामहून लावले जाणारे वृक्ष नाही किंवा आंब्याच्या बागा फुलविण्याचा विचार येथील शेतकरी करत नाही. धुऱ्यावर, रस्त्याच्या काठावर खाल्लेल्या आंब्याच्या कोया फेकल्यानंतर स्वतःच उगवलेले आणि मोठे झालेले वृक्ष, अशी जिल्ह्यातील स्थिती आहे. अशा तऱ्हेने वाशिम जिल्ह्यात साधारणतः एक हजार हेक्टरवर आंबे उभे असलेले दिसतात.



**वाशिमकरांना आवडतो आंबा**
१. वाशिमकरांना बैगन फल्ली, नीलम व दसेरी हा आंबा प्रचंड आवडतो. शिवाय, या आंब्याचे दर सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे असतात.
२. अत्यंत महाग असल्याने हापूस, केसर हा आंबा श्रीमंतांचा आंबा म्हणून ओळखला जातो. आर्थिकदृष्ट्या उत्तम असणाऱ्यांकडेच हा आंबा चवीने घेतला जातो.
३. वाशिम मध्ये येणारा रत्नागिरी येथील हापूस आंबा सेकंड ग्रेडचा असतो. फर्स्ट ग्रेडचा आंबा विक्रीला कधीच उपलब्ध नसतो.

**माचवून खाण्याच्या गावरान आंब्याची गोडीच वेगळी**
गावरान आंबा हा आकाराने लहान असतो. त्यामुळे, माचवून माचवून त्याचा रस पिण्याची गोडी वेगळीच असते. या आंब्याचा रसही विनापाणी मिसळून खाल्ला जातो. हा आंबा आजही गडचिरोली आदी भागातून मागवण्यावर अनेकांचा भर असतो. झाडांमुळे माकडांचा उपद्रव प्रचंड असतो आणि त्यामुळे, शेतातील उभ्या पिकांची नासधूस होते. म्हणून आंब्याची झाडे लावली जात नाहीत.

**गरिबांचा आंबाही महाग**
पिकलेल्या आंब्याचा हा सीझन नसल्याने आणि आवक कमी असल्याने गरिबांचा आंबा म्हणून ओळख असलेले नीलम, बैगन फल्ली, दसेरी हे आंबेही प्रचंड महाग आहेत. १५० ते २०० रुपये किलो असे दर आहेत. आवक वाढली की दर कमी होतात.

**गावरान आंब्याचे क्षेत्र घटले**
१. इतर क्षेत्रातून येणाऱ्या आंब्याचे वाढलेले महत्त्व आणि त्या क्षेत्रातील आंब्याचे झालेले ब्रॅण्डिंग यामुळे गावरान आंब्याचे महत्त्व आपसूकच घटले.
२. गावरान आंब्याला किंमत कमी मिळत असल्याने, शेतकऱ्यांनी ही झाडे तोडून टाकली व त्याऐवजी कलमी आंब्याची झाडे लावण्यास सुरुवात केली.
३. आंब्याचे झाड मोठे असल्याने, सावलीही मोठी होते. सावलीमुळे आंतरिक पीक घेणे कठीण जाते. म्हणून आंब्याची झाडे उभी राहू नयेत, असाच प्रयत्न असतो.

# शेलुबाजार येथे अवैध जुगार अड्डयावर धाड.. 3 लक्ष 43 हजार रु. चा मुद्देमाल जप्त

महाराष्ट्र जीत

**महादेव हरणे**
**वाशिम :-** समाजात शांतता व सुव्यवस्था राहावी त्याचबरोबर अवैध धंदयावर प्रतिबंध व्हावा यासाठी वाशिम जिल्हा पोलीस दलात तर्फे सतत कार्यवाही सुरु असतात त्याच पार्श्वभुमीवर वाशिम जिल्हयात अवैधरित्या चालत असलेल्या जुगार अंडयांना पायबंद घालण्याकरिता जिल्हयात विशेष मोहिम राबविण्यात आली. त्या अनुषंगाने दिनांक 09/05/2025 रोजी मा.नवदीप अग्रवाल (भा. पो.से.) सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग वाशिम चार्ज मंगरुळपीर यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम व मंगरुळपीर येथील कार्यालयीन स्टॉफसह पो.स्टे. मंगरुळपीर



हद्दीतील ग्राम शेलुबाजार ता. मंगरुळपीर जि. वाशिम येथे शिवकमल बार अन्ड रेष्टारंटचे वरील पहील्या मजल्यावर अवैध वरली मटका, जुगार पैसाचे हारजितवर चालणा-या जुगारावर रेड करुन नगदी 102,380/- रुपये 02 मोटर सायकल, 09 मोबाईल व जुगार साहीत्य असा एकुण 3,43,520/- रुपयाचा मुददेमाल जप्त केला असून आरोपी 1. विशाल विलास चौधरी वय 35 वर्षे रा. शेलुबाजार 2. शरद अनंतराव बोबडे वय 55 वर्षे रा. शेलुबाजार 3. मारोती सिताराम टोंचर वय 60 वर्षे रा.शेलुबाजार 4. बापूराव प्रभाकर चव्हाण वय 52 वर्षे रा.शेलुबाजार 5. दिलीप रामभाऊ हिवरे वय 55 वर्षे रा. शेलुबाजार 6. विनोद किसन मनवर वय 41 वर्षे रा.लाठी 7. बाळू तुळशीराम ठाकरे वय 55 वर्षे रा. पार्डीताड 8. दिलीप ज्ञानबा नितनवरे वय 55 वर्षे रा. शेलुबाजार 9. नरेंद्र केशवराव आडोळे वय 45 वर्षे रा.शेलुबाजार 10. धम्मा सोनुने रा.नांदखेडा 11. पिंटू ऊर्फ रामेश्वर मोहळे रा. नांदखेडा 12. श्रीकांत वानखेडे रा. खामगांव याचेवर पो.स्टे. मंगरुळपीर येथे महाराष्ट्र जुगार कायदया प्रमाणे गुन्हा नोंद करुन कार्यवाही केली आहे. सदर ची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक वाशिम श्री. अनुज तारे (IPS), श्रीमती लता फड अपर पोलीस अधीक्षक वाशिम यांच्या मार्गदर्शनाने श्री. नवदीप अग्रवाल सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग वाशिम नेतृत्वात कार्यालयीन स्टॉप सपोनि अतुल इंगोले, पोउपनि ज्ञानेश्वर नाईकवाडे वाशिम शहर, उविपोअ कार्यालय मंगरुळपीर येथील पोहेकॉ /747, रविद्र कातखेडे पोकॉ/1468 अनंता डौलसे, पोकॉ/316 सुमीत चव्हाण व उपविपोअ कार्यालय वाशिम येथील पोहेकॉ /379 हरिभाऊ कालापाड, पोहेकॉ/538 अरविंद राठोड, पोकॉ/1310 स्वप्नील शेळके, यांनी पार पाडली.

# अँटी करप्शन बोर्ड तर्फे बेस्ट लीडरशिप पुरस्काराने देवेंद्र दत्तात्रय देशमुख यांचा सन्मान

महाराष्ट्र जीत

**भिवंडी दि. (सुनील झळके)** अँटी करप्शन बोर्ड (रजि), नवी दिल्ली ही संस्था संपूर्ण देशभर कार्यरत आहे. या संस्थेचे वार्षिक संमेलन कॉन्स्टिट्युशन क्लब ऑफ इंडिया, संसद भवन मार्ग, इंडिया गेट जवळ, नवी दिल्ली या ठिकाणी संपन्न झाले. या कार्यक्रमात देशभरातून जवळपास 150 पदाधिकारी उपस्थित होते. त्यापैकी श्री. देवेंद्र दत्तात्रय देशमुख, ठाणे जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, यांना बेस्ट लीडरशिप पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी अँटी करप्शन बोर्ड, नवी दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री आर. के. जैन, राष्ट्रीय उपाध्यक्ष श्री आण्णासाहेब खैरनार व अनेक क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार देऊन श्री. देवेंद्र दत्तात्रय देशमुख यांना सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रसार माध्यमानी त्यांच्याशी संपर्क साधला असता हा माझा गौरव नसून मी केलेल्या




कार्याचा गौरव आहे. याचे संपूर्ण श्रेय त्यांनी ठाणे, पुणे, पालघर आणि महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील माझे सहकारी यांचा सन्मान आहे असे त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सांगितले. समाजातील गरजू व दुर्लक्षित समाजबांधवाना न्याय मिळवून देण्यासाठी व बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी आम्ही सरकारी योजनांचा अभ्यास करून त्या योजना बेरोजगारांना उपलब्ध करून देणे हे सुद्धा आमचं भविष्यातील कार्य असेल असेही त्यांनी आवर्जून सांगितले. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे समाजातील विविध स्तरावर मनःपूर्वक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.